
सूरज गाताडे
दि डेथ ऑफ लिंकन्स मदर

# दि डेथ ऑफ़ लिंकन्स मदर

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

दि डेथ ऑफ़ लिंकन्स मदर

सूरज काशिनाथ गाताडे
चिंगळे गल्ली, पेठ वडगांव
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
महाराष्ट्र 416112

mob.no – 9021584727

surajgatade26@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन :४ जून २०१७

©esahity Pratishthan®2017

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# “दी डेथ् ऑफ लिंकन्स् मदर”

(लेखक - सूरज काशिनाथ गाताडे)

नमस्कार वाचका मित्रा आणि मैत्रिणी

मी सूरज काशिनाथ गाताडे.

सहावीत असताना २००५ साली मी १२ वर्षांचा असताना मी लिहायला लागलो. लहानपणापासून अकबर - बिरबल, तेनाली रमण, पंचतंत्र, इसापनीती इ. गोष्टी, अनेक चित्रकथा वाचून, कार्टून्स् पाहून मला लिहिण्याची प्रेरणा मिळाली. आणि माझा लेखन प्रवास चालू झाला...

पण मी कधीच माझी कोणतीच कथा प्रकाशित नाही केली. मी स्वतःच्या समाधानासाठी लिहित होतो. एवढया मोठया प्रमाणात माझी कथा प्रकाशित करण्याची ही माझी पहिलीच वेळ...

दोन फिल्म् प्रोडक्शन्स हाऊसेस्साठी मी कंसेप्ट रायटर, व स्क्रीप्ट डॉक्टर म्हणून काम केले आहे. आत्ता मराठीत वेगवेगळे प्रयोग होत असले तरी सायन्स् फिक्शन, क्राईम फिक्शन, सस्पेन्स्, थ्रिलर, ॲक्शन, इ. जन्राज् अजूनही हाताळले जात नाहीत म्हणून मला मराठीत अशा प्रकारचे नवनवीन व वेगवेगळे जन्राज् हाताळायचे आहेत व म्हणूनच स्वतः फिल्म् प्रोड्युसर होण्याची माझी इच्छा आहे. फायनान्स् प्रोब्लेम आहे; पण ईश्वर इच्छा असेल, तर हे स्वप्न नक्की पूर्ण होईल. नाही झालेच, तर निदान प्रयत्न केल्याचे समाधान गाठीशी राहिलच...

मला बिझिनेस बुक्स्, आत्मचरित्रे, सस्पेन्स्, थ्रिलर, क्राईम व सायन्स् फिक्शन जन्राज् वाचण्यास खूप आवडतात. तरी मी प्रत्येक प्रकारचं वाचन करतो.

संपर्क व पत्ता - चिंगळे गल्ली, पेठ वडगांव.
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर,
महाराष्ट्र - ४१६ ११२
मो. नं. ९०२१५८४७२७
ई. मेल - surajgatade26@gmail.com



## मनोगत -

'डॉक' या चरित्राची पायाभरणी २००७ साली मी आठवीत असतानाच झाली होती. त्यावेळी मी हौस म्हणून या व्यक्तिरेखेवर चित्रकथा लिहित होतो. ३ - ४ पानं झाल्यावर मी ती माझ्या एका मित्राला दाखवली. पण तो तितकासा इम्प्रेस झाला नाही. म्हणून मग मी ठरवले, की क्राईम - डिटेक्टिव्ह फिक्शनला तोपर्यंत हात लावायचा नाही जोपर्यंत आपण मॅच्युअर होत नाही. आणि मी या व्यक्तिरेखेची वाढ थांबवली.

दरम्यान मी सायन्स् फिक्शन या कथा प्रकारावर भर दिला. लहान सहान बोधकथाही लिहिल्या. बऱ्याच कंसेप्ट्स्, स्क्रीप्टस् ही लिहिल्या. पण कधी माझं लिखाण मी प्रकाशित नाही केलं. २०१२ साली मी लोकल न्युजपेपर व मॅगझीनमध्ये मी माझ्या काही कथा प्रकाशित केल्या एवढंच...

२०१४ ला मला आत्मविश्वास वाटू लागला, तेव्हा मी ही कथा पुन्हा नव्यानं हातात घेतली व तयार झाली 'दी डेथ ऑफ लिंकन्स् मदर'.

डॉकना त्यांचं नांवही त्याचवेळी मिळलं. कथा झाली पण ती पूर्ण झालीय असं माझं मलाच वाटेना. कथाविस्तारासाठी खूप सारे प्लॉटस् डोक्यात घोळत होते. कोणताही फायनल होत नव्हता. वर्ष यातच गेले. माझ्या एका मित्राने ही कथा वाचल्यानंतर मला कोल्हापूरातील नेसरीकर वाडा दाखवला. तो वाडा पाहून मी इतका इन्स्पायर झालो, की कथा आपोआप रूप घेवू लागली व मी पुढील तीन दिवसांत पूर्ण रिसर्च करून ही कथा कंप्लिट केली.

माझ्या आणखी एका मित्राकडून मला नंतर ई साहित्यबद्दल समजले. त्याने मला चकवा ही कथा वाचण्यास दिली होती. नंतर मी बरीचशी पुस्तकं साईटवरून डाऊनलोड करून वाचली. ती अजून संग्रही आहेत.

येथे कथा प्रकाशित करावी अशी इच्छा खूप दिवसांची. पण संकोच वाटत होता. शिवाय कसे प्रकाशित करावे याबद्दलही काही माहिती नव्हती. काही दिवसांपूर्वी मी सौरभ वागळे यांच्या डिटेक्टिव्ह अल्फाच्या कथा वाचल्या होत्या. अनायासे ते माझ्या शाळकरी मित्रांचे वर्गमित्रच निघाले. वालचंद कॉलेजला ते एकत्र शिकत होते. मी त्यांच्याशी संपर्क करून त्यांच्या व ई साहित्य टीमच्या गाईडन्स्‌ने ही कथा प्रकाशित करत आहे.

मी माझे मित्र सौरभ वागळे, सुनील सामंत सर व ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे मनःपुर्वक आभार मानतो. ज्यांनी मला व माझ्या या कथेला वाचकांसमोर आणण्याची सुवर्णसंधी मला दिली.

आणि वाचकांनाही मनापासून धन्यवाद. आपल्या सर्वांमुळेच नवलेखकांना आपली कला, विचार मांडण्यासाठी एक प्लॅटफॉर्म उपलब्ध झाला आहे.

आपल्या सर्वांना कोटी कोटी धन्यवाद...

एक आठवण -



आमच्या घरात सगळयांनाच वाचनाची आवड. पण मी आणि पप्पा तर महिन्याला मॅक्स् स्टॉक संपवायचोच. पण मी स्वतः लिहित असून माझं लेखन कधीच आई - पप्पांना वाचायला दिलं नाही. मला खूप अवघडल्या सारखं वाटतं. पप्पांचं आणि माझंही जास्त पटत नव्हतं. आमचं जरी एकमेकांवर प्रेम असलं तरी आमच्या बरेच मतभेद असल्यानं ते आम्ही कधी प्रकट करत नसू.

पण एक दिवस हिमंत करून ‘दी डेथ ऑफ लिंकन्स् मदर’ ही कथा मी माझ्या मोबाईलवर वाचत होतो. पप्पांनी ती ऐकावी अशी माझी इच्छा होती. पण पप्पांना मी तसं काहीच सांगितलं नाही. माझा मीच वाचतोय असं भासवत होतो. कथा वाचत असताना काही प्रकरणं झाल्यावर मी थांबलो. मोबाईलमध्ये चुळबूळ करू लागलो. खरं तर माझ्या वाचनाकडं पप्पांचं लक्ष आहे की नाही ते मला पहायचं होतं. मी वाचायचं थांबलोय हे पाहून पप्पांनी माझ्याकडं बघितलं.

“काय झालं? वाच की!” ते मला म्हणाले.

“काय नाय. चूकून बाहेर आलो.” मी म्हणालो.

माझ्या वाचनाकडं पप्पांचं लक्ष आहे हे पाहून मला समाधान वाटलं. पप्पा मग खूर्ची ओढून माझ्यापाशी बसले. आणि मी संकोच सोडून ती कथा पूर्ण केली.

पप्पांना ही कथा प्रचंड आवडली. त्यांनी मला लेखकाचं नावं विचारलं.

“मीच लिहिलीय.” मी म्हणालो.

त्यावर पप्पांची रिॲक्शन अशी होती,

“काय? तू लिहिल्यास?”

त्यांना विश्वासच वाटला नाही, की ही कथा माझी आहे.

“कशी वाटली?” मी विचारलं.

माझ्या छातीत धडधडत होतं. पप्पा काय प्रतिक्रिया देतायत हे मला जाणण्याची उत्सुकता लागून राहिली होती.

“भारी हाय.” पप्पा म्हणाले.

त्यांना ही कथा प्रचंड आवडली होती. त्यांचं हे उत्तर ऐकून मला खूप समाधान वाटलं होतं.

१० ऑक्टोबर २०१६ ला पप्पा अचानक वारले. आज ३० मे २०१७ ला मी हे लिहित आहे. सात महिने झाले पप्पांना जावून...

मी माझी एखाद्या कथेचं पहिल्यांदाच एवढया मोठया स्तरावर लोकार्पण करत आहे. त्यामुळं मग मी ठरवलं, की ती हीच कथा असावी, जी पप्पांना आवडली होती.

मी खरंच ई साहित्य प्रतिष्ठानचे व मा. श्री. सूनील सामंत सरांचे खूप खूप आभार मानतो.

आणि माझ्यासारख्या अनेको वाचकांनाही धन्यवाद देतो...

माझ्या आई - वडील, मोठी बहिण, सर्व मित्र व नातेवाईकांना...

आणि प्रिय वाचकांना सादर अर्पण...

“दी डेथ् ऑफ लिंकन्स् मदर”

लेखक - सूरज काशिनाथ गाताडे

(१)

नमस्कार, मी केवल; केवल उपाध्याय. आय्. पी. एस्. ऑफिसर होण्याची माझी इच्छा आहे. मला मनापासून समाजातील प्रत्येक घटकाची सेवा करायची असल्याने मी माझ्या स्वप्नाबद्दल लहानपणापासूनच खूपच सजग आहे. आणि म्हणूनच १२ वी नंतरच त्यादृष्टीने माझा अभ्यास सूरू होता. सुट्टी लागताच अवांतर वाचनाला सुरवात केली. दिवस - रात्र फक्त वाचन करायचो.

माझ्या बाबांना माझ्या स्वप्नाबद्दल पूर्ण जाणीव आहे व त्यांचीही तशीच इच्छा आहे. पण त्यांच्यानुसार, फक्त वाचनानं अनुभव मिळत नाही. जीवनाची खरी समज यायची असेल, तर स्वत: प्रत्येक गोष्ट अनुभवावी लागते. फक्त स्वत:च्या अनुभवानेच माणसाचे आचार, विचार व त्याचे जीवन समृद्ध होते; त्याची बूद्धीही प्रगल्भ व वृद्धींगत होते, असे माझे बाबा म्हणतात.

एक दिवस - रात्री, जेवण करून मी पुन्हा वाचनासाठी माझ्या खोलीत गेलो. मी 'इ. डब्ल्यू. हॉर्नन्ग' यांची 'आयडस् ऑफ दी मार्च' नांवाची शॉर्ट स्टोरी वाचत होतो. या कथेतील नायक 'ए. के. रॅफेल्स्' हा एक पांढरपेशी चोर, 'बन्नी' नांवाच्या कफल्लक झालेल्या शाळकरी मित्राला शब्दांच्या भ्रमजाळात फसवून त्याच्यासोबत चोरी करण्यास त्याला बाध्य करतो.

कथा वाचत असतानाच माझ्या खोलीच्या दारावर कोणी तरी नॉक केलं. मी दार उघडलं. समोर बाबा उभे होते. ते आत येऊन बेडवर बसले आणि मला समोर बसण्यास सांगितलं. मी स्टडी टेबल जवळची खूर्ची ओढून बाबांसमोर बसलो. बाबांनी शेजारी पडलेलं, मी वाचत असलेलं पुस्तक हाती घेतले व ते पुस्तक चाळू लागले. थोड्यावेळाने त्यांनी पुस्तक बंद करून माझ्याकडे पाहिलं व म्हणाले,

“तुझा अभ्यास तुझ्या परीने चालू आहे, ते ठिक आहे. पण मला असं वाटतं, की तू आत्ता पासूनच फील्ड एक्सपिरीयन्स घ्यावास!”

आणि त्यांनी मला श्री. बळवंत रामचंद्र सूर्यवंशी यांच्याबद्दल सांगितलं. मिस्टर सूर्यवंशी हे माझ्या वडिलांचे मित्र सुयोग यांचे वडील. ते मिलिटरी इन्टेलिजेन्सचे

रिटायर्ड डिरेक्टर जनरल आहेत. कार्गिलच्या युद्धात त्यांच्या नेतृत्त्वाखाली मिलिटरी इन्टेलिजेन्सने खूप महत्त्वाची कामगिरी पार पाडली होती. ज्यायोगे भारताचा त्या युद्धात विजय झाला होता. तीस वर्षे इन्टेलिजेन्स मध्ये काम करून दहा वर्षा पूर्वी ते रिटायर्ड झाले. मिलिटरी इन्टेलिजेन्स मधून जरी ते रिटायर्ड झाले असले, तरी ते अजूनही देश सेवेतून रिटायर्ड झालेले नाहीत. मिस्टर सूर्यवंशी गेली दहा वर्षे प्रायवेट डीटेक्टीव म्हणून काम करत आहेत. सामान्य लोकांना विनामुल्य न्याय मिळवून देणे हेच त्याचे मुख्य ब्रीद आहे.

बाबांनी मला सांगितले, की त्यांनी मि. सूर्यवंशी यांच्यांशी माझ्याबद्दल बोलणं केलं आहे आणि उद्या सकाळी ९ वाजता मला त्यांना भेटायचं आहे.

"पण मी त्यांना ओळखणार कसं?" मी विचारले.

माझ्या प्रश्नावर बाबा हसले आणि म्हणाले,

"तू त्यांना ओळखण्याची गरज नाही. ते तुला ओळखतील!"

मी थोडा गोंधळलो. माझी मनःस्थिती पाहून बाबा पुन्हा हसले,

"काळजी करू नको. मी तुला त्यांच्या घरचा पत्ता देईन."

मी मि. सूर्यवंशी यांना भेटायला जायचं बाबांना कबूल केलं.

(२)

दूसऱ्या दिवशी सकाळी, मी लवकर उठून सगळी नित्यकर्मे आटोपली आणि फॉर्मल ड्रेस घालून बाबांनी सांगितल्यानुसार सकाळी ८ वाजता त्यांच्या घरी जाण्यास निघालो...

के. एम्. टी. ने मला कोल्हापूरला पोहोचायला पाऊण तास लागला. बाबांनी दिलेल्या पत्त्यावर चालत पोहोचायला मला पंधरा ते वीस मिनीटे लागणार होती. मि. सूर्यवंशी यांचे अपार्ट मेंट राजारामपूरीत पाचव्या गल्लीत आहे. मी के. एम्. टी. मधून खाली उतरलो. घड्याळ पाहिले, तर ८:५0 झाले होते. आणि म्हणून मी त्यांच्या अपार्टमेंटच्या दिशेने पळू लागलो. ८:५७ ला मी '**समर्थ अपार्टमेंट**'पाशी पोहोचलो. माझ्याकडे फक्त तीनच मिनिटं होती. आणि मला वेळेत त्यांच्या फ्लॅटवर पोहोचायचंच होतं. मी घाईने अपार्टमेंटमध्ये शिरलो. मि. सूर्यवंशी हे तेथे तिसऱ्या मजल्यावर राहतात. त्यांच्या अपार्टमेंटमध्ये लिफ्ट नसल्यानं मला जिन्यावरून जाणं भाग होतं. मी धावतच जिन्याच्या पायऱ्या चढू लागलो. बरोबर तीन मिनिटांनी मी मि. सूर्यवंशी यांच्या फ्लॅट समोर उभा होतो. माझा श्वासोच्छ्वास जोरात चालू होता. दारावरची 'रिटा. डि. जी. ऑफ एम्. आय्. - मि. बी. सूर्य वंशी' ही पाटी वाचून मी बेल वाजवली. आतून मि. सूर्यवंशी यांचा आवाज आला,

“ये केवल. ये. दार उघडंच आहे.”

मला खूप आश्चर्य वाटलं. काही क्षणांसाठी तर मला असं वाटलं, की मि. सूर्यवंशी यांच्याकडे काही अलौकीक शक्ती आहे की काय! मी दार ढकलून आत गेलो. माझं जोरानं श्वासोच्छ्वास करणं चालूच होतं.

आत माझ्यासमोर, मि. सूर्यवंशी बाल्कनीत चहा पित उभे होते.

इतकं वय असूनही त्यांचे केस अजूनही नैसर्गिक काळे आहेत. डोळे पाणीदार व तीक्ष्ण आहेत. ओठावर पिळदार मिशा ही आहेत. ६.३ फूट उंचीचे मि. सूर्यवंशी बलदंड शरीरयष्टीचे मालक आहेत. अगदी नांवाला साजेसं त्यांचं व्यक्तिमत्त्व आहे; ‘बळवंत’!

ते माझ्याकडे पाहत स्माईल करत होते. त्यांनी मला जवळ बोलावलं. प्रेमानं माझ्या पाठीवरून हात हिरवला आणि मला सोफ्यावर बसण्यास सांगितलं. मी बसलो. पण अजूनही माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतंच, की यांनी मला कधीही न पाहता ओळखलं कसं? किंबहूना दारात मीच उभा आहे हे तरी यांना कसं समजलं? पण त्यांचं व्यक्तिमत्त्व पाहता त्यांना प्रश्न करण्याचे माझं धाडस होईना.

मि. सूर्यवंशी यांच्या घरी कोणी नव्हतं. तरीही त्यांनी माझं यथोचित स्वागत केलं. माझ्यासमोर टी-पॉयवर ठेवलेलं पाणी व चहा घेण्यास त्यांनी मला आग्रह केला. दम लागल्याने मी आधी थोडं पाणी प्यायलो. नंतर चहाचा कप हातात घेऊन पिऊ लागलो.

तो चहा  मि. सूर्यवंशींनी माझ्यासाठी स्वत: बनवला होता. यावरून त्यांच्यात असलेलं ममत्त्व स्पष्ट होत होतं. तरीही मला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अजूनही दरारा वाटतच होता. मि. सूर्य वंशींनी काहीवेळ माझ्याकडं पाहिलं. बहूधा ते माझ्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज घेत असावेत. नंतर ते पुन्हा बाल्कनीतून बाहेर पाहून चहाचा आस्वाद घेऊ लागले. मी नजर फिरवून घराचा अंदाज घेऊ लागलो. ज्यायोगे मि. सूर्यवंशी यांच्या स्वभावाचा अंदाज येऊन त्यांच्याशी संभाषण करण्यास, त्यांच्याशी संवाद साधण्यास मला सोपे जाईल. खरं तर मी बोलण्यासाठी काही तरी विषय शोधत होतो. काही क्षणांचीच शांतता होती ती; पण मि. सूर्यवंशींबद्दल मला वाटत असलेल्या भितीमुळं ती मला असहय होत होती...

कसंय, की प्रत्येक व्यक्तीचा त्याच्या आसपासच्या वस्तू व वास्तूवर प्रभाव हा पडतच असतो. तसंच काहीसं मि. सूर्यवंशी यांच्या घराबद्दलही होतं. प्रत्येक गोष्ट शिस्तबद्धपणे मांडलेली होती. कोठेही अस्थाव्यस्थता किंवा कचरा नव्हता, पण इतके असूनही या घराला गेली कित्येक वर्षे स्त्रीचा स्पर्श झाला नाही हे स्पष्ट होतं. मी काही न बोलतातच बसलो होतो. माझ्यासमोरचा फोटो बघत. तो फोटो मि. सूर्यवंशी यांच्या  कार्गिलचं युद्ध जिंकल्यानंतरचा त्यांच्या साथीदारांबरोबर आपला राष्ट्रीय ध्वज फडकवतानाचा होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा आनंद वर्णन करण्या पलिकडचा होता.

मला आठवतंय, १२ वी च्या मराठी ओरल टेस्ट वेळी आम्हाला आमचे शिक्षक आमच्या करीयर सिलेक्शन बद्दल विचारत होते. मी म्हणालो, मला देशाची सेवा करायचीय. म्हणून मला

आय. पी. एस्. ऑफिसर व्हायचंय. तेव्हा मला सर म्हणाले,

"तुझ्या आयुष्यात अशी काय घटना घडलीय, की तुला देशसेवा करू वाटते?"

आय मीन, सिरीयस्ली? म्हणजे माझ्या देशावर मी प्रेम करण्यासाठी मला कोणत्या कारणाची गरज पडायलाच पाहिजे का? कहर म्हणजे माझ्या शिक्षकांनीच मला हा प्रश्न विचारला होता. जे विद्‌यार्थ्यांना देशभक्तीची मुल्ये शिकवतात...

माझा चहा संपला होता. मी कप टी-पॉयवरच्या ट्रेवर ठेवला व पुन्हा इकडं तिकडं नजर टाकू लागलो. मि. सूर्यवंशी यांचाही चहा झाला होता. शेवटचा घोट घेत ते माझ्यापाशी येवून बसले. त्यांनी ही कप ट्रेवर ठेवला व म्हणाले,

"असं दिसतंय की तुला गरम चहा पिण्याची सवय आहे. मला तर अजिबातच सहन होत नाही गरम चहा."

शांतता भंग करण्यासाठी ते बोलले. मी फक्त स्माईल केलं. मी गप्पच होतो. माझ्या मनात पुन्हा पुन्हा तोच प्रश्न फेर धरून होता आणि बहुधा हे त्यांच्याही लक्षात आलं असावं. आता त्यांनी थेट मुद्दयालाच हात घातला,

"तुला हाच प्रश्न पडला आहे ना, की मी तुला ओळखलं कसं?" ते म्हणाले.

मी गोंधळलेल्या स्थितीत स्मित करत फक्त होकारार्थी मान हलवली. मि. सूर्यवंशी हसले व म्हणाले,

“तुझा श्वास फुललाय. यावरून माझ्या हे लक्षात आलं, की तू पळत आला आहेस. दिसतंय वेळेसंबंधी तू खूप पंक्चुअल आहेस ते. शिवाय आता तू वेल ड्रेस्ड् आहेस. सुट्टीच्या दिवशी एक मुलगा वेल ड्रेस्ड् असणं हे दर्शवतं, की त्याची खूप महत्त्वाची मिटींग असणार. तुझा वक्तशीरपणा व आपल्या मिटींग संबंधीचं तुझं गांभीर्य हेच दर्शवतं, की तू तुझ्या ध्येयासंबंधी, करीयर संबंधी खूप सिरीयस् आहेस. या सर्व गोष्टींवरून मला अंदाज लावणं अवघड नव्हतं, की तूच केवल आहेस.”

मी अवाक्. हे पाहून ते अचानक स्वतःच मोठयानं हसू लागले. मला काहीच कळेना... ते पुढं बोलले,

“मी असलं काही तरी बडबडेन असंच तुला वाटलेलं असणार? मी डिटेक्टीव्ह आहे म्हणन तुला माझ्याकडून काही तरी वेगळी अपेक्षा असणार. नाही? असलं सगळं कादंबरीत. असं नसतं मुला. खऱ्या आयुष्यात असलं कोणी बडबडत नाही. तू हुशार असशील, आणि हे तुला माहित असेल, तर ते तुला कोणाला तरी सिद्ध करण्याची गरज का वाटावी? असंय बघ, कधी कधी गोष्टी खूप सोप्या असतात. आपणही त्या सोप्याच ठेवल्या पाहिजेत. नजर, कान आणि डोकं उघडं ठेव फक्त. हा तुझा फर्स्ट लेसन. किती सोपंय, अरे मी बाल्कनीत उभा होतो. तुला येताना मी पाहिलं असणार ही गोष्ट तुझ्या लक्षात यायला हवी होती.

मी बाल्कनीत तुझीच वाट बघत उभा होतो. तुला पळत येताना पाहिलंय मी. आज मी एकच मिटींग ठेवली होती. ती फक्त तुझ्याबरोबर. लक्षात ठेव, फिक्शनल नॉवेल्स्पेक्षा रियालीटी खूप वेगळी असते. मला तुझ्या वडिलांनी सांगितलंय, की तुला डिटेक्टीव्ह नॉवेल्स् वाचायला आवडतात. त्यांतली माहिती लक्षात

ठेव, पण ते कधी शब्दशः घ्यायचं नाही. सेकेन्ड लेसन; स्पीक प्रिसाय्स्ली. डॉन्ट एक्स्प्लेन एव्हरी थींग यू नो! पण; जाणून बरं वाटलं, की तुला आपल्या देशासाठी काही तरी करण्याची इच्छा आहे. नाही तर आजची पिढी फक्त स्वतःच्याच विचारात दंग असते."

शेवटचं वाक्य बोलताना ते खरंच अंर्तमूख झाले होते. त्यांचे डोळे समोरच्या त्या फोटोवर होते. माझ्याकडं बघून पुढं ते बोलले,

"असो; आय् ॲम ग्लॅड, की तू वेळेवर आलास. तू एक मिनिट जरी उशीर केला असतास, तर मी तुला माझा असिस्टंट म्हणून नेमलं नसतं!"

मी गोंधळलो,

"म्हणजे?"

मि. सूर्यवंशी पुन्हा हसले, "अभिनंदन! आजपासून तू माझा असिस्टंट आहेस!"

"ओह! थॅंक्स् ... थॅन्कयू आजोबा!" मी आनंदाने अचानक बोलून गेलो.

मि. सूर्यवंशी यांनी स्माईल करतच माझ्याकडे एक कटाक्ष टाकला. म्हणाले,

"आजोबा? इतका वयस्कर वाटतो मी तुला?"

माझ्या चेहऱ्यावरचं हसूच गायब झाले. पुढं ते म्हणाले,

"कॉल मी डॉक!"

आणि पुन्हा त्यांनी स्माईल केलं. मीही आता भिड सोडून हसू लागलो. इतक्यात त्यांचा लॅंड लाईन वाजला. डॉकनी कॉल रिसिव्ह केला...

थोडयावेळानं -

"ठिक आहे. पोहोचतो मी तेथे."

डॉकनी रिसिव्हर खाली ठेवला.

"काय झाले डॉक?" मी गंभीरपणे विचारलं. डॉकनी माझ्याकडे पाहिलं.

"यू आर ए लकी बॉय माय लॅड! पहिल्याच दिवशी तुला एक केस् मिळाली आहे. चल!"

डॉक उठले. मी ही उठलो. आम्ही घरातून बाहेर पडलो. डॉकनी घराला कुलूप लावलं.

खाली येऊन डॉकनी बेसमेंटमधून गाडी बाहेर काढली. मी अपार्टमेंट बाहेर येऊन उभा होतो. गाडी माझ्यापाशी आली. मी गाडीत त्यांच्या शेजारी बसलो. सीटबेल्ट लावून घेतला. डॉक गाडी चालवू लागले.

गाडीत -

“डॉक; तुम्ही सांगितले नाही, की केस् काय आहे?” मी विचारलं.

“मि. ॲल्फ्रेड मॅक स्मिथ यांचा त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला आहे. वीस वर्षांपूर्वी ते भारतात शास्त्रीय संगीताचा अभ्यास करण्यासाठी आलेले. शाहू महाराजांच्या दरबारातील शाही गवई पंडीत अल्लादीयाँ खाँ साहेब यांच्या विषयी अभ्यास करण्यासाठी ते कोल्हापूरात येऊन राहिले होते. इन्स्पेक्टर जगताप यांना संशय आहे, की त्यांचा खुन झाला आहे. आणि त्या संदर्भातच त्यांनी आपल्याला लक्ष्मीपूरीतील मि. स्मिथ यांच्या बंगल्यावर बोलवलं आहे.” ते ड्राईव्ह करत बोलत होते.

(३)

काही वेळातच आम्ही स्मिथ यांच्या बंगल्यावर पोहोचलो. इन्स्पेक्टर बाहेरच त्यांच्या जीपपाशी उभे होते. ते आमचीच वाट पाहत होते. डॉक आणि मी गाडीतून उतरून इन्स्पेक्टर यांच्या दिशेने चालू लागलो. इन्स्पेक्टरही अस्वस्थ होते. तेही घाईने काही पावलं आमच्या दिशेनं आले. डॉक मात्र शांत होते. त्यांनी इन्स्पेक्टरशी हात मिळवून अभिवादन केलं.

"गुड मॉर्निंग इन्स्पेक्टर, मला संपूर्ण केस एक्सप्लेन करा."

"मि. स्मिथ यांच्या कंपोजिशन राईटस् संबंधी काही वाद होता. म्हणून त्यांनीच काल फोन करून मला यायला सांगितलं होतं. आजारी असल्यानं पोलीस स्टेशनला येवू शकत नाही म्हणाले. मला काल वेळ नव्हता म्हणून मी त्यांना उद्या येतो म्हणालो. आज सकाळी स्टेशनला जाण्याआधी मि. स्मिथना भेटायचं म्हणून आलो होतो. अर्ध्या तासापूर्वीच मी येथे आलो. त्यांच्या बेडरूममध्ये गेलो, तेव्हा त्यांचा मृतदेह त्यांच्या आराम खूर्चीत पडलेला होता. त्यांच्या बॉडी पोजिशनवरून मला शंका वाटली, की हा नैसर्गिक मृत्यू नाही. आणि म्हणूनच मी आपल्याला इथं बोलावलंय. त्यांच्या चोरीला गेलेल्या कंपोजिशन संबधीचंच हे प्रकरण असेल असं मला वाटतं."

"तुमचा प्राथमिक तपास काय सांगतो?"

"मी मिसेस् स्मिथ व नोकरांकडे चौकशी केली. त्यांच्याकडून समजलं, की मि. स्मिथ यांना रोज रात्री शास्त्रीय

संगीत ऐकत झोपण्याची सवय होती. त्यांच्या जून्या ग्रामोफोनवर ते शास्त्रीय संगीताचे रेकॉर्डस् ऐकायचे. रात्रभर कोणीही त्यांना डिस्टर्ब करायचं नाही अशी त्यांची मिसेस् स्मिथ व नोकरांना सक्त ताकीद होती. त्यामुळेच त्यांच्या मृत्यूबद्दल घरातील सर्वांना सकाळीच समजलं. पण आता प्रश्न असा आहे, की बंद खोलीत त्यांचा खून झाला कसा आणि कोणी केला? कारण रात्री आतून बंद केलेली खोली सकाळीच उघडली जायची. आणि ती ही मि. स्मिथ उघडायचे. आज सकाळी खूप वेळ मि. स्मिथ खोलीतून बाहेर आले नाहीत म्हणून त्यांना बाहेरून आवाज देण्यात आला. आतून जेव्हा काही रिस्पोंन्स् आला नाही, तेव्हा नोकरांनी खोलीचा दरवाजा तोडला. त्यावेळी नोकरांना मि. स्मिथ हे त्यांच्या आराम खूर्चीत मृतावस्थेत आढळले. आश्‍र्चयाची गोष्ट म्हणजे, स्मिथ यांच्या पायाशी मला गरूड पंख सापडले.”

“गरूडपंख? स्ट्रेन्ज!” डॉक म्हणाले.

मी एक लहान डायरी नेहमी सोबत ठेवतो. इन्स्पेक्टर बोलत असताना दरम्यान; त्यांची प्रत्येक गोष्ट मी त्या डायरीत नमूद करत होतो.

“मला खोली चेक करावी लागेल.” डॉक इन्स्पेक्टरना म्हणाले.

“हो. या ना.” इन्स्पेक्टर घराच्या दिशेनं चालू लागले.

आणि आम्ही इन्स्पेक्टर जगताप यांच्या मागून चालू

लागलो.

"आणि हा. आणखी एक गोष्ट, मिसेस् स्मिथ यांचे पी. एच्. डी. चे काही विद्‌यार्थीही येतात त्यांच्याकडं शिकायला. मी त्यांची पण चौकशी केली पण ते सगळेच सकाळी नऊला येतात व संध्याकाळी सात वाजता घरी निघून जातात. त्यामुळं त्यांच्याकडून म्हणावी तशी खूनाविषयी विषेश माहिती मिळाली नाही."

मि. स्मिथ यांच्या बंगल्यासमोरच एक लहान बगीचा होता. बागेत खूप सुंदर झुडूपं होती. त्यांना सुंदर फूलंही लागली होती. शिवाय सकाळच्या वातावरणामुळं त्या फूलांचा सुगंध आसपासच्या परिसरात पसरला होता. आम्ही त्या बगीचातून घराच्या दिशेनं चालू लागलो. चालता - चालता डॉक काही झुडूपांपाशी थांबले.

त्यांनी थोडावेळ त्या झुडूपांना निरखून पाहिलं. इन्स्पेक्टर जगताप यांच्या हे लक्षात आलं. ते परत मागं आले.

"काय झालं डॉक?" इन्स्पेक्टरनी विचारले.

डॉकनी "काही नाही" या अर्थानं मान हलवली व पुढं चालू लागले. मी त्यांच्या पाठी होतोच. समोरून मिसेस् स्मिथ पाणावलेल्या डोळयांनी आमच्या दिशेने आल्या. इन्स्पेक्टर जगतापनी डॉक व मिसेस् स्मिथ यांची ओळख करून दिली.

"मिसेस् स्मिथ, ही इज् मि. बळवंत सूर्यवंशी. ए प्रायव्हेट डिटेक्टीव्ह!"

मिसेस् स्मिथ यांनी अभिवादन करण्यासाठी डॉक यांच्या

दिशेने हाथ केला. डॉकनी त्यांचा हात हातात घेतला.

"यू आर फ्रॉम नॉर्थइस्ट अमेरिका ॲन्ड ए बॉटनी रिसर्चर टू!" डॉक मिसेस् स्मिथ यांना म्हणाले.

"याह! इटस् राइट! हाऊ डू यू नो?" मिसेस् स्मिथ यांनी आश्चर्यानं डॉक यांना प्रश्न केला.

डॉक काही बोलले नाहीत. त्यांचं पहिलं तत्त्व त्यांनी आधीच मला सांगितलं असल्यानं माझ्या लक्षात आलं, की त्यांना त्यांच्या प्रश्नाचं उत्तर मिळणार नाही. जादूगार जसा त्याच्या मॅजीक ट्रीक्सचं रहस्य कोणाला सांगत नाही, तसं डिटेक्टीव्हसही ही त्यांच्या डिडक्शन्स् व प्रिजम्शन्सचे सिक्रेट कधी कोणाला सांगत नाहीत. हे माहित असूनही डॉक यांनी तंतोतंत लावलेल्या तर्कामुळे मलाही खूप आश्चर्य वाटलंच. आणि उत्साहाच्या भरात मी मध्येच बोललो,

"हो! मिसेस् स्टेला स्मिथ एकदा आमच्या कॉलेजवर बॉटनीच्या गेस्ट लेक्चरर म्हणूनही आल्या होत्या!"

मिसेस् स्मिथ गेली वीस वर्षे कोल्हापूरात राहत असल्याने त्यांना बऱ्यापैकी मराठी येत होतं. त्यांनी माझ्याकडे पाहिले,

"याह, आय रिमेंबर यू! यू आर ए ब्रिलियंट स्टूडंट!"

"थॅन्क यू मॅम्!"

"कॅन आय् सी द रूम प्लीज्?" डॉकनी मिसेस् स्मिथ यांना विचारले.

"कम वीथ मी."

मिसेस् स्मिथ पुढे चालू लागल्या. मी, डॉक व इन्स्पेकटर त्यांच्या मागून खोलीत गेलो.

खोलीत -

डॉक मि. स्मिथ यांच्या डेड बॉडीची पाहणी करू लागले. मिसेस् स्मिथ मागंच दरवाजापाशी उभ्या होत्या. मी व इन्स्पेक्टर ही डॉक यांच्या थोडं मागंच उभे होतो. डॉकनी डेड बॉडीकडं पाहतच अचानक मला विचारलं,

"तुला काय वाटतंय केवल; काय झालं असंल?"

मी थोडा पुढं झालो. मि. स्मिथ यांच्या बॉडीचं नीट निरीक्षण करून मी डॉकना म्हणालो,

"यांचं तोंड उघडं आहे. डोळे मोठे झाले आहेत. माथ्यावर सुखलेल्या घामापासून बनलेले क्षार दिसताहेत. मे बी मृत्यूपूर्वी यांना श्वसनाचा त्रास झाला असावा. कदाचित यांना दम्याचा आजार होता आणि मृत्यूपूर्वी यांना दम्याचा मोठा अटॅक आला होता. यांचा डावा हात त्यांच्या कुर्त्याच्या खिशात आहे; म्हणजे हे डावखूरे असून खिशात इन्हेलर शोधत असावेत, पण इन्हेलर रोजच्या ठिकाणी म्हणजे त्यांच्या खिशात त्यांना सापडलं नसावं. आणि अटॅक इतका मोठा होता, की इन्हेलर शोधण्यासाठी त्यांना आरामखूर्चीतून उठण्याचा किंवा कोणाला हाक मारण्याचा वेळही मिळाला नाही. ज्या अर्थी इन्हेलर त्यांच्या नेहमीच्या ठिकाणी नव्हतं, त्या अर्थी यांना जीवे मारण्याचा कोणाचा तरी प्रयत्न होता; जो यशस्वी झाला आहे!"

मी बोलत होतो इतक्यात डॉकनी संपूर्ण खोलीची पाहणी करून घेतली होती. नोकरांना एकेकाला बाजूला घेवून त्यांच्याशी काही बोलणेही चालू होते त्यांचे. त्यांना मोजकंच आणि मुद्दयाचं बोलायची सवय आहे त्यामुळं माझं बोलणं संपण्याआधी त्यांनी एवढया गोष्टी केल्या होत्या. माझा तर्क ऐकून त्यांनी माझ्याकडं पाहिलं,

"तुझा तर्क काही अंशी बरोबर आहे. मि. स्मिथ यांना दम्याचा आजार होता. काल रात्री त्यांना दम्याचा अटॅक आला होता हे ही खरं आहे. पण त्यांचा मृत्यू फक्त दम्याच्या अटॅकमुळं नाही झालेला, तर यांना दूधातून विष देऊन मारण्यात आलं आहे!"

डॉक इन्स्पेक्टरपाशी गेले,

"मला सांगा इन्स्पेक्टर, तुम्ही ज्यावेळी इथं आलात, तेव्हा तुम्हाला मि. स्मिथ यांनी काल रात्री ज्या ग्लास मधून दूध घेतलं, तो ग्लास मिळाला का?"

"नाही." इन्स्पेक्टरनी खुलासा केला.

"याचा अर्थ खून घरातील व्यक्तीनंच केला आहे!"

" हे तुम्ही कशावरून बोलताय डॉक?" इन्स्पेक्टरनी प्रश्न केला.

"मि. स्मिथ यांना रोज रात्री दूध पिण्याची सवय होती. नोकरांकडून ही गोष्ट स्पष्ट झाली आहे मला. पण तुमच्यापासून ती जाणीवपूर्वक लपवण्यात आली आहे. इथं ग्रामोफोन शेजारी टेबलवर बघा. दूधाच्या स्निग्धतेमुळं दूधाच्या ग्लासच्या खालच्या भागाचं वलय तयार झालेलं आहे. चाळीस - बेचाळीस वर्षांचा

व्यक्ती एका रात्री असा अचानक दूध नक्कीच घेणार नाही. आता मि. स्मिथ यांच्या तोंडाकडं आणि ओठांकडं बघा. तुमच्या लक्षात येईल, की त्यांच्या तोंडातून फेस आला होता. तो कोणी तरी गडबडीने पुसला आहे. शिवाय दूधाचा ग्लासही येथून गायब आहे. आता आपल्याला विष कोणतं होतं व ते कोणी दिलं ते शोधयचं आहे. आणि मला वाटतं; याची मला कल्पना आहे!"

डॉकनी मिसेस् स्मिथ यांच्याकडे पाहिलं,

"काय; बरोबर ना मिसेस् स्मिथ?"

डॉक यांच्या उद्‌गारावरून मिसेस् स्मिथ चपापल्या. इन्स्पेक्टरनी जगतापही

गोंधळून गेले.

"म्हणजे तुम्हाला म्हणायचे आहे, की मिसेस् स्टेला यांनीच..."

"होय इन्स्पेक्टर! मि. ॲल्फ्रेड स्मिथ यांचा खून स्टेला स्मिथ यांनीच केला आहे!"

"काय बोलताय डॉक? स्टेला स्मिथ या तर ॲल्फ्रेड स्मिथ यांच्या पत्नी आहेत..."

"इन्स्पेक्टर; आपण या आधी अशा केसेस् पाहिल्या नाहीत काय? नोकरांकडून किंवा त्या विद्‌यार्थ्यांकडून तुम्हाला कळलं नाही मि. स्मिथ आणि स्टेला स्मिथ यांच्यातील वादाबद्दल?

"कळालं होतं. पण मला ते इतकं विशेष नाही वाटलं. आता नवरा बायको मध्ये

वाद हे होतच असतात. पण म्हणून स्टेला यांच्यासारख्या सुशील स्त्री हे असं काही करतील असं मला वाटलं नाही... सॉरी डॉक..."

"इट्स ओके. पण पुढं लक्षात ठेवा. कोणताही दूवा दुर्ल क्षित होता कामा नये." डॉक शांतपणे बोलत होते, पण आता ते गंभीर झाले,

"आता काय आणि कसं झालं ते मी सांगतो. मि. स्मिथ हे मिसेस् स्मिथ यांना रोज मारहाण करायचे. या गोष्टीला कंटाळूनच मिसेस् स्मिथ यांनी 'अजेर्टिना अल्टीसिमा' म्हणजेच 'व्हाईट स्नेकरूट'; ज्यात 'ट्रेमेडोल' नावांचं विष असतं, त्या रोपाच्या पाल्याचा रस दूधात मिसळून ते दूध मि. स्मिथ यांना रात्री प्यायला दिलं.

याच पाल्याचा अंश असलेलं दूध ग्रहण केल्यानंच १८१८ मध्ये स्वतंत्र अमेरिकेचे १६ वे राष्ट्रपती 'अॅब्रेहेम लिंकन' यांच्या आई 'नॅन्सी हॅन्कस् लिंकन' यांचाही मृत्यू झाला होता. त्यामुळे हे रोप तिथं सगळयांनाच माहित आहे.

१९ व्या शतकाच्या सुरवातीला जेव्हा सर्वाधिक युरोपियन अमेरिकन्स् पूर्वेकडून मध्य पश्चिम व दक्षिणेच्या वरील भागात स्थलांतरीत झाले, जे या रोपापासून पूर्णत: अनभिज्ञ होते, त्यांची जनावरे या रोपाचं सेवन करायचे. ज्यामुळं ट्रेमेडॉल नांवांचं हे विष त्यांच्या शरीरात पसरायचं. अशा जनावरांचं विषयुक्त दूध व मांसाच्या सेवनानं त्याकाळी हजारो लोक मृत्यूमुखी पडले होते. त्यातच लिंकन यांच्या आईही होत्या!"

डॉक यांचं स्पष्टिकरण ऐकून इन्स्पेक्टर मिसेस् स्मिथ

यांच्याकडं गेले,

"इज् इट ट्रू मिसेस् स्मिथ?" त्यांनी कठोरपणानं विचारलं.

मिसेस् स्मिथ रडू अनावर होऊन आक्रोश करत मोठयाने रडू लागल्या. त्यांचा तोल जावून त्या खाली कोसळल्या.

"येस! येस! इटस् ट्रू! इटस् ट्रू!..."

आणि त्या जोरजोरात रडू लागल्या. मी अविश्वासानं त्यांच्याकडं पाहत होतो. माझ्या लक्षात आलं, की खोली बाहेर दरवाजात बरेच जण जमले आहेत. त्यांच्या कडं पाहता सगळी कॉलेज स्टूडन्टस असावेत असं मला वाटलं. मे बी स्टेला मॅमचे विद्यार्थी...

किती वाईट परिस्थिती होती ही... त्यांच्या विद्यार्थ्यांसमोर त्यांचं हे असं रूप समोर यावं... मी पण त्यांचा विद्यार्थीच तर होतो; एक दिवसाचा का असेना... मला त्यांच्यासाठी खूप वाईट वाटत होतं. त्यांनी असं का करावं? शिकवायला आलेल्या त्यावेळी तर या किती प्रेमळ वाटत होत्या. मघाशीही त्यांनी मला एकदाच पाहिलेलं असूनही ओळखलं होतं.

इन्स्पेक्टर पुन्हा डॉककडे आले.

"पण तुम्हाला हे कळलं कसं डॉक?" इन्स्पेक्टरनी आश्चर्याने विचारले.

"तुम्हाला आठवतंय इन्स्पेक्टर; बागेत काही झुडूपांपाशी मी काही काळ थांबलो होतो?" डॉकनी इन्स्पेक्टरना प्रतिप्रश्न केला.

"हं!" इन्स्पेक्टर गोंधळून उद्गारले.

"ती सर्व विषारी झाडं होती!" डॉक सांगू लागले,

"त्यातच मला अजेर्टिना अल्टिसीमा हे रोपटं दिसलं. जे फक्त दक्षिण अमेरिकेतील पूर्विय भागतच आढळतं. त्या रोपाची मातीही त्याच प्रदेशातली होती. यावरून मिसेस् स्टेला स्मिथ या त्याच भागातील असल्याचं माझ्या लक्षात आलं. त्याच्या शेजारीच 'नेरियम ओलिएन्डर' नांवाचं रोप होतं. जे जगभरात जवळ - जवळ सर्वत्र आढळतं. तसं ते दक्षिण आशिया म्हणजे आपल्या इथेही आढळतं. हे रोप साधारणत: 'कणेरी'चीच एक प्रजाती आहे. या दोन्ही रोपांचे गूणधर्म वेगळे असले, तरी दोन्हीही विषारी रोपंच आहेत. कोणीही साधारण व्यक्ती अशी विषारी झुडूपं आपल्या बागेत लावणार नाही. शिवाय 'व्हाईट स्नेकरूट' एवढं विषारी रोप भारतात आणण्यासाठी सामान्य व्यक्तीला परवाणगी तर मिळणारच नाही. यावरून माझ्या असं लक्षात आलं, की मिसेस् स्टेला स्मिथ या 'बॉटनी'च्या अभ्यासक आहेत.

मिसेस् स्मिथ जेव्हा बाहेर आल्या होत्या, तेव्हा त्यांच्या डोळयांत अश्रू होते. पण ते अश्रू पती गेल्याचे नाही, तर पश्चातापाचे होते. विचार करा इन्स्पेक्टर, ज्या स्त्रीचा नवरा गेलाय, ती स्वतः आपल्याला बाहेर भेटायला आली. हे जरा तरी पटण्यासारखं आहे?! शिवाय त्या काहीच झालं नाही असं आपल्याशी बोलत होत्या. त्याचवेळी घडला प्रकार माझ्या लक्षात आला होता. पण मृतदेहाची पाहणी केल्याशिवाय कोणत्याही निष्कर्षावर पोहोचणं मला योग्य वाटलं नाही. त्यानंतर स्टेला यांचा हात जेव्हा मी हातात घेतला, तेव्हा त्यांच्या हातावर मारहाणीच्या खूणा मला आढळल्या. काही जुन्या, तर काही नवीन. यावरून मि. स्मिथ हे रोज मिसेस् स्मिथ यांना मारहाण

करत असणार हे माझ्या लक्षात आलं आणि यावरूनच मला मिसेस् स्टेला यांनी मि. स्मिथ यांना मारण्यामागचं कारणही समजलं.”

“पण मिसेस् स्मिथ यांनी ‘अजेर्टिना अल्टिसीमा’ वनस्पतीचंच विष मि. स्मिथ यांना दिले आहे हे तुमच्या कसं लक्षात आलं? आणि त्यांनी हेच रोपटं का निवडलं?” इन्स्पेक्टरनी विचारले.

“मी जेव्हा ती वनस्पती पाहिली त्यावेळी त्या वनस्पतीची पानं तोडली असल्याचं माझ्या लक्षात आलं. नंतर मिसेस् स्टेला यांचा हात ज्यावेळी मी हातात घेतला, तेव्हा माझ्या हे लक्षात आले, की मिसेस् स्टेला यांच्या हाताच्या त्वचेचा रंग लालसर झाला आहे व त्यांनी त्वचेचा दाह कमी करण्यासाठी हातावर ऑइन्टमेंट लावलेले आहे. याचा अर्थ असा, की त्यांचा त्या विषारी कणेरीशी संपर्क आला होता. एक बॉटनीची प्रोफेसर कोणतीही दक्षता न बाळगता विषारी कणेरीच्या संपर्कात जाणे शक्य नाही. या वरून लक्षात येते, की मिसेस् स्मिथ यांनी मि. स्मिथ यांचा खून ठरवून केलेला नाही; तर रागाच्या भरात केला आहे. कारण कालही मि. स्मिथ यांनी मिसेस् स्मिथ यांना मारले होते आणि मिसेस् स्मिथ यांच्या मि. स्मिथवरील रागाचे परिवर्तन त्यांच्या खूनात झाले.

राहिला प्रश्न ‘अजेर्टिना अल्टिसीमा’च का? तर, याच्या रसामुळं स्वशनाचा त्रास होतो. कोणालाही हेच वाटेल, की मि. स्मिथ हे दम्यामुळं मेलेत. कोणाला साधा संशयही येणार नाही, की त्यांचा खून झाला आहे. मिसेस् स्मिथ खूप हुशार आहेत. नाही?!” आणि त्यांनी मिसेस् स्मिथ यांच्याकडं पााहिलं.

त्या खाली जमिनीवर टक लावून होत्या. त्यांची नजर शुन्यात आणि डोळयांतून जमिनीवर ओघळणाऱ्या

अश्रूंवर स्थिर होती.

दरम्यान डॉक यांचा प्रत्येक शब्द मी माझ्याकडील डायरीत लिहीत होतो.

"पण मग तो दूधाचा ग्लास?" इन्स्पेक्टरनी प्रश्न केला.

डॉकनी मिसेस् स्मिथ यांच्याकडे पाहिले,

"आता ते मिसेस् स्मिथच सांगतील!"

मिसेस् स्मिथ हुंदके देतच बोलू लागल्या;

"येस्! आइव् कील्ड माय हसबन्ड! ही ऑलवेज युज्ड् टू बीट मी! येस्टर्डे, ही क्रॉस्ड् हीज् लिमिडस्. ॲन्ड् देन्; आय डिसाइडेड् तू कील हीम! आय ॲम रिर्सर्चीन्ग अबाऊट दी डिरेक्ट इफेक्ट ऑफ 'अजेर्टिना अल्टिसीमा' ऑन हयुमन बिईन्ग. ॲन्ड् बिकॉज् ऑफ दॅट, आय ब्रॉट दी प्लान्ट ॲन्ड इटस् युजफूल सॉइल फ्रॉम दी नॉर्थ अमेरिका विथ परमिशन ऑफ अमेरिकेन् ॲन्ड इंडियन ऑथोरिटीज्! माझ्या रिसर्चमध्ये मला हे लक्षात आले होते, की या प्लान्टच्या ज्यूस्ने ब्रिदींग् प्रोब्लेम होतो. ॲल्फ्रेडला अस्थमा असल्याने या प्लान्टचा ज्यूस मिल्क मधून त्याला देण्याचे ठरवले. त्यानंतर मी त्याचे इन्हेलर लपवले. बिकॉज् ऑफ दॅट, ही डाइड् बाय अस्थमा अटॅक! व्हेन् इन्स्पेक्टर केम हिअर ऑन दी अर्ली मॉर्निन्ग, आय टोल्ड माय सर्वन्ट टू अटेन हीम्. गीव्ह हीम् सम् टी ऑर कॉफी. देन् आय केम् इन दी रूम ॲन्ड वाईप्ड् ॲल्फ्रेडस् माऊथ. अफ्टर दॅट आय हीड् दी ग्लास बिहाइन्ड्

ढी..."

"सोफा!" डॉक म्हणाले,

"रूम मध्ये आल्यापासून तुमचे लक्ष सतत तिकडेच आहे. बरोबर ना?!"

"येस्...!" आणि मिसेस् स्मिथ पुन्हा हुंदके देत रडू लागल्या...

मागे उभे त्यांचे सर्वच विद्यार्थी कावरे बावरे झाले होते. कोणालाच काहीच सुचत नव्हतं.

डॉक गंभीरपणे त्यांना म्हणाले,

"मिसेस् स्मिथ, जरी तुम्ही हा खून रागाच्या भरात केला असला, जरी तुम्हाला तुमच्या कृत्याबद्दल पश्चाताप होत असला; तरी ही गुन्हा हा गुन्हाच असतो. त्यामुळे तुम्हाला शिक्षा ही होणारच!"

डॉकनी इन्स्पेक्टर जगतापना इशारा केला. इन्स्पेक्टर डॉकचा इशारा

समजले.

"येस् डॉक!"

आणि इन्स्पेक्टरनी लक्ष्मीपुरी चौकीवर फोन लावून लेडी कॉन्स्टेबलला मि. स्मिथ यांच्या बंगल्यावर येण्यास सांगितले.

"थॅन्क्स् डॉक! पण या वनस्पतीबद्दल आपल्याला इतके कसे काय ठाऊक?" इन्स्पेक्टरनी उत्सुकतेने विचारले.

"तुम्हाला तर माहीतच आहे इन्स्पेक्टर, युद्धसमयी स्वत:ला वाचवण्यासाठी काय खावे, काय खावू नये हे समजवण्यासाठी प्रत्येक वनस्पती व प्राण्याची माहिती दिली जाते. इन्टेलिजन्स्मध्ये असल्याने अशा गोष्टींची माहिती ठेवावी लागते. अमेरिकन इतिहास तर प्रसिद्ध आहे. शिवाय रिटायरमेन्ट नंतरही मी विज्ञान, कला क्षेत्रातील विविध ब्रान्चेस्च्या अनेक डॉक्टरेटस् मिळवल्या आहेत. शिक्षणाला वयाचे बंधन नसते. नाही?!"

मी संपूर्ण केस् डायरीत नमूद करून घेतली. डॉक माझ्याकडे आले. मी लिहित असलेली डायरी डॉकनी हातात घेतली. तसा मी थोडा संकोचलो. पण मी लिहिलेल्या नोटस् पाहून त्यांच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. त्यांनी डायरी माझ्याकडे देत माझ्या पाठीवरून हात फिरवला व म्हणाले,

"तू तुझ्या स्वप्नपूर्तीपासून दूर नाहीस मुला!"

त्यांचे हे वाक्य ऐकून मी खरेच खूप सुखावलो.

पंधरा वीस मिनिटांतच, लेडी कॉन्स्टेबल आल्या व मिसेस् स्मिथ यांना घेऊन गेल्या. त्यांची नजर झुकलेली होती. त्यांच्या विद्यार्थ्यांनीही खाली पाहतच त्यांना जाण्यास वाट करून दिली. इन्स्पेक्टरनी डॉक यांचा हात हातात घेऊन अभिवादन केले.

"धन्यवाद डॉक!"

"इटस् ऑल राईट इन्स्पेक्टर, पण मी दिलेले पुरावे हे पुर्णत: तर्काच्या आधारावर आहेत. त्यामुळे स्ट्रॉन्ग एविडेन्स्साठी मि. स्मिथ यांची बॉडी पोस्टमोर्टमसाठी पाठवा आणि तो दूधाचा ग्लास व ती दोन्ही रोपेही फॉरेन्सिकला पाठवून द्या. तुम्हाला

पक्के पुरावे मिळतील!"

"हो. ते तर करावेच लागेल. बाय् द वे; थॅन्कस् वन्स् अगेन्! बाय्!"

"बाय्!" डॉकनी हसून इन्स्पेक्टरना निरोप दिला.

इन्स्पेक्टर सोफ्याकडे गेले. त्यांनी सोफ्याच्या मागचा ग्लास रूमालाच्या सहाय्याने उचलला व दरवाजाच्या दिशेने जावू लागले. मी मध्ये उभा होतो. ते माझ्यापाशी थांबले. त्यांनी स्माईल करत अभिवादन करण्यासाठी हात समोर केला,

"अरे, आपली तर ओळखच झाली नाही. हाय्! मी अमित यशवंत जगताप. या एरियाचा इन्चार्ज् आहे मी."

मी ही त्यांचा हात हातात घेतला व त्यांना हसून अभिवादन केले.

"हाय! मी केवल श्यामसत्य उपाध्याय. पेठ वडगांवहून. मी याच वर्षी १२ वीची परिक्षा दिली आहे. ग्रॅज्युएशन नंतर आय्. पी. एस्. करण्याची माझी इच्छा आहे."

"तुझे ऑब्सर्वेशन् चांगले आहे. तू नक्की एक चांगला ऑफिसर होशील!" इन्स्पेक्टर हसत खात्रीने म्हणाले.

त्यांनी डॉककडे पाहिले,

"डॉक, तुमचा असिस्टंट खूप हुशार आहे हं!"

असे म्हणून ते हसले. डॉकनी ही स्माईल केले.

"थॅन्क्स् सर!" मी इन्स्पेक्टरना म्हणालो.

इन्स्पेक्टरनी माझ्याकडे पाहून पुन्हा स्माईल केले आणि कॉन्स्टेबलला फोन लावून त्यांना ॲम्ब्युलन्स् घेऊन येण्यास सांगत फोनवर बोलतच ते रूममधून बाहेर गेले. मी मागे वळून त्यांच्याकडे पाहत होतो. डॉक माझ्याकडे आले. त्यांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्यांच्या स्पर्शाने मी भानावर आलो. मी त्यांच्याकडे पाहिले. ते माझ्याकडे पाहून स्माईल करत होते.

“मग काय ऑफिसर; निघायचं?” ते म्हणाले.

मी होकारार्थी मान हलवली. दोघे बाहेर आलो. डॉक यांच्या कारमध्ये बसून घराकडे निघालो...

# (४)

कारमध्ये; माझ्या डोक्यात एक गोष्ट मात्र सारखी घोळत होती. ती ही, की डॉक तर मला म्हणाले, की कोणत्याही गोष्टीचे स्पष्टिकरण द्‌यायचं नाही. तर मग; त्यांनीच झालेल्या घटनेचं एवढं सविस्तर स्पष्टिकरण का दिलं...? समोर इन्स्पेक्टर होते म्हणून...? डोन्ट नो."

मी बाहेर पाहत होतो. पण माझ्या लक्षात आलं होतं, डॉक माझ्याकडं पाहून स्मित करत होते.

संध्याकाळची वेळ, डॉकनी मला माझ्या घरापाशी सोडले. मी त्यांना घरात येण्याचा आग्रह केला. पण "पुन्हा कधी तरी!" असे बोलून ते निघून गेले. मी विस्मयकारी भाव चेहऱ्यावर घेवून गाडीतून जाणाऱ्या त्या अद्‌भूत व्यक्तिमत्त्वाकडे पाहत तेथेच उभा होतो. दूर जाणाऱ्या त्या गाडी सोबतच त्याच वेगाने पश्चिमेला सूर्यही अस्ताला जात होता...

रात्री, जेवण झाल्यावर मी खोलीत गेलो व 'अजेर्टिना अल्टिसीमा' या वनस्पतीची माहिती नेटवर सर्च केली आणि मि. स्मिथ यांच्या केस्‌चा माझ्या परीने एक रिपोर्ट तयार केला.

(५)

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून प्राणायाम व इतर व्यायाम आवरून आंघोळ केली. तेव्हाच डॉक यांचा घरच्या लॅंड लाईनवर मला फोन आला. त्यांनी तातडीने मला त्यांच्या घरी यायला सांगितले. अगदी तासाभरात मी त्यांच्या फ्लॅटवर पोहोचलो. डॉकनी आतून ओरडून मला आत येण्यास सांगितलं. माझ्या पावलांचा त्यांना आवाज आला असावा. कालच्या अनुभवावरून मी येताना बाल्कनीत नजर टाकाली होती. ते बाल्कनीत नव्हते. दार फक्त पुढं केलेलं होतं. मी दार ढकलून आत गेलो. डॉक काही तरी वाचण्यात गर्क होते. मी जाऊन त्यांच्या समोर बसलो. डॉकनी वर माझ्याकडं पाहिलं व ते वाचत असलेला कागद त्यांनी माझ्यासमोर धरला. मी तो घेवून वाचू लागलो. तो मि. स्मिथ यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट होता. लिहिलं होतं,

'मि. स्मिथ यांचा मृत्यू ट्रेमेडॉल या विषामुळे झालाय, पण पोटात अन्नाचा व पाण्याचा सोडल्यास इतर कोणत्याही प्रकारच्या द्रव्याचा अंश नाही.'

वाचून मला धक्काच बसला. मी प्रश्नार्थक नजरेनं डॉक यांच्याकडं पाहिलं. डॉक गंभीर होते. ते फक्त एवढंच म्हणाले,

"सकाळी एक कॉन्स्टेबल येवून देवून गेला."

थोडावेळ असाच गेला. मग ते पुढं म्हणाले,

"तुला असं वाटत असेल ना, की आपण ज्याच्याकडं

शिकायला आलोय, त्यालाच काही येत नाही?!" त्यांच्या बोलण्यातून हताषा जाणवत होती. मला बोलायचे होते; सांगायचे होते, की 'तसे काही नाही डॉक!' पण माझ्या तोंडातून शब्दच फुटेना. मी फक्त "नाही!" अशा अर्थाने मानच हलवू शकलो. इतक्यात डॉकना इन्स्पेक्टर जगताप यांचा फोन आला...

डॉक फोनवर -

"हो. मी वाचला. पण तरीही माझी एक विनंती आहे इन्स्पेक्टर, प्लीज् तुर्तास तरी स्टेला स्मिथ यांना सोडू नका! आम्ही इन्व्हेस्टीगेशनसाठी आणखी एकदा स्मिथ यांच्या घरी

जावून येतो."

आणि त्यांनी फोन ठेवला. "केवल, चल!" एवढंच म्हणून ते घराबाहेर पडले. मी त्यांच्या मागून गेलो.

(६)

मि. स्मिथ यांच्या बंगल्यावर; आम्ही गाडीतून उतरलो. इन्स्पेक्टर जगतापनी एक कॉन्स्टेबल पहाऱ्यासाठी बंगल्यावर ठेवला होता. डॉकनी कॉन्स्टेबलला बाहेरच थांबण्यास सांगितलं. आम्ही आत जावू लागलो. तक्षणी माझी नजर सील तोडलेल्या कडी - कुलूपावर गेली. कदाचित इन्स्पेक्टरनी कॉन्स्टेबलला आम्ही येणार असल्याचे फोन करून सांगितले असेल व म्हणून कॉन्स्टेबलनीच सील तोडलं असेल असं वाटून मी डॉकना काही बोललो नाही.

बेडरूममध्ये प्रवेश केल्या - केल्या आमच्या हे लक्षात आलं, की टेबलवरील मि. स्मिथ यांचा ग्रामोफोन गायब झाला आहे. आत्ता दाराचं सील तुटल्याचं खरं कारण माझ्या लक्षात आलं. कदाचित डॉकच्या हे आधीच लक्षात आलं असावं. नाही तर अशी मोठी गोष्ट डॉकच्या नजरेतून सुटणं कठीण! कदाचित घडलेला सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला असावा. म्हणूनच ते एका जागी निर्विकार उभे होते. मी मात्र संपूर्ण खोलीची काळजीपूर्वक पाहणी करू लागलो. मला खोलीत हलके बूटांचे ठसे आढळले. जे ओल्या फडक्याने पुसण्याचाही प्रयत्न केला गेला होता. तसे वण जमिनीवर स्पष्ट दिसत होते. मी डॉककडे जावून त्या ठशांकडे अंगुली निर्देश केला.

पण डॉक मला म्हणाले,

“या खूणा जाणीवपुर्वक करण्यात आल्या आहेत. कारण

चोराला जर आपल्या खूणा दूसऱ्याला दिसू नयेत असं वाटत असेल, तर तो त्या मुद्दाम दिसतील अशा प्रकारे का पुसेल? तू नीट पाहिलंस तर हे तुझ्या लक्षात येईल. म्हणजे चोर कोणाला तरी मुद्दाम अडकवण्याचा आणि आपली दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतोय. त्यामुळे या ठशांचा आपल्याला काही एक उपयोग नाही."

"ज्या अर्थी त्या चोराने हे केलंय, त्या अर्थी त्याच्याकडे खूप वेळ असणार! बरोबर ना डॉक?" डॉकचं बोलणं ऐकून मी माझा तर्क व्यक्त केला.

डॉक फक्त होकारार्थी मान हलवून ते गडबडीने बाहेर पडले. मीही त्याच गडबडीने त्यांना फॉलो केले.

त्यांनी इन्स्पेक्टरना फोन लावला व त्यांच्याकडून पहारा करणाऱ्या कॉन्स्टेबलची चौकशी करण्याबद्दलची परवाणगी मागून घेतली. डॉकच्या चेहऱ्यावरून लक्षात येत होतं, की त्यांना परवाणगी मिळाली आहे. त्यांनी फोन कॉन्स्टेबलला दिला. कॉन्स्टेबलनी फोन घेतला.

"ठिक आहे साहेब!" येवढंच म्हणून त्यांनी मोबाईल डॉकना परत केला.

"काल रात्री तुम्हाला झोप लागली होती का?" डॉकनी कॉन्स्टेबलला प्रश्न करण्यास सुरूवात केली.

" नाही साहेब..." कॉन्स्टेबलनी थोडं घाबरतचं उत्तर दिलं.

"तुम्हाला कसलं व्यसन? म्हणजे दारू, तंबाखू, सिगरेट वगैरे?"

" नाही साहेब..."

"मला नीट आठवून सांगा. काल रात्री काय झालं. हे बघा घाबरून जर तुम्ही काही लपवत असाल, तर तुम्हाला ते खूप महागात पडेल. कारण काल इथं चोरी झाली आहे;  तेही सील तोडून! आणि त्यावेळी सिक्युरिटीसाठी तुम्ही इथं होता. याचा अर्थ तुम्ही चोरी केली असाही होवू शकतो!"

"मी चोरी नाही केली साहेब...!" कॉन्स्टेबल खूपच घाबरले होते.

"माहित आहे मला. फक्त काल काय झालं तेवढं सांगा!"

"मध्यरात्री, अचानक कशाचा तरी वास हवेत पसरला होता आणि त्यानंतर थोडयाचवेळात मी बेशुद्ध पडलो."

" ठिक आहे. आता तरी नीट लक्ष ठेवा!"

अशी ताकीद देवून डॉक आवाराच्या बाहेर पडले. काही वेळ ते परिसरात फिरले. थोडयावेळानं त्यांनी मला मोठयानं हाक मारली.

"केवल; इकडं ये!"

बंगल्याच्या उजव्या बाजूला मी धावत त्या गल्लीच्या कोपऱ्यावर जेथे डॉक उभे होते तेथे पोहोचलो. एका राखेच्या छोटया ढिगाऱ्यापाशी ते उभे होते. त्यांनी माझ्याकडं पाहिलं.

"काय वाटतंय?" त्यांनी विचारलं.

"उन्हाळयाच्या दिवसांत शेकोटी? संशयास्पद आहे!"

“गुड!”

मी डॉककडे पाहीलं,

“ॲज आय थॉट!” ते उद्गारले .

“म्हणजे?” मी विचारलं.

“आठव कॉन्स्टेबल काय म्हणाले.”

“ते म्हणाले होते की मध्यरात्री कसला तरी वास हवेत...”

बोलता - बोलता माझे डोळे विस्फारले. मला समजलं होतं की काय झालं होतं ते. हे डॉकच्या लक्षात आलं होतं. माझा चेहरा बघून ते स्मित करत म्हणाले,

“थांबू नको बोल!”

“चोराने येथे शेकोटी करून त्यात बेशुध्द करणारे औषध मिसळले. जे हवेत मिसळून श्वासावाटे कॉन्स्टेबल यांच्या फुफ्फुसात गेले व ते बेशुध्द झाले.”

“राईट!”

“पण मग ते औषध कोणतं असेल? क्लोरोफॉर्म?”

“मला नाही वाटत. तुझ्या लक्षात आलंय का, की जो कोणी चोर आहे; तोच खूनी आहे. नाही तर कोणी फक्त, एक जूना ग्रामोफोन घेवून जाण्याचा प्रयत्न का करेल? तेही बाहेर पोलिस तैनात असताना? शिवाय आणखी काही मौल्यवान वस्तू वा रोकड तर गायब व्हायला हवी होती. आणि मी जो विचार करतोय तो योग्य असेल, तर ती जी कोणी व्यक्ती आहे; ती सायन्सची

मास्टर असेल! अशी व्यक्ती क्लोरोफॉर्म सारखे वेलनोन केमिकल नक्कीच वापरणार नाही!"

"मग? आणि मग स्टेला मॅमचं काय?" मी विचारलं.

"ती राख गोळा कर. आपल्याला त्याची टेस्ट करावी लागेल. शिवाय कॉन्स्टेबलचीही ब्लड टेस्ट करून बघू. तरच काही कळू शकेल. गाडीच्या कम्पार्टमेन्ट मध्ये तुला पॉलिथीन बॅग मिळेल. येताना त्यातील सिरेंज ही घेवून ये."

मी गाडीकडे धावलो. डॉक कॉन्स्टेबलकडे परतले. मी गाडीतील पॉलिथीन बॅग घेवून राख त्यात भरली व सिरेंज घेवून डॉक यांच्याकडे गेलो.

डॉकनी कॉन्स्टेबलचे रक्त घेवून त्यांना पुन्हा काळजीपुर्वक लक्ष देण्याची ताकीद केली. आणि आम्ही डॉकच्या घरी परतलो.

(७)

डॉक यांच्या घरीच एक छोटी लॅब आहे. डॉक स्वतः ब्लड सॅम्पल चेक करू लागले. मी राख घेवून मागे उभा होतो. थोडा वेळ डॉकचे काम चालले. मी खूप अस्वस्थ होतो. काही कळत नव्हतं. मी अधीर होऊन म्हणालो,

"डॉक, या राखेचं करायचंय काय? याची टेस्ट कधी करणार आहात?"

डॉक मायक्रोस्कोप मध्ये पहातच म्हणाले,

"त्याची गरज नाही. मी सांगतो ते रेणूसुत्र लिहून घे !"

मी राखेची पिशवी डेस्कवर ठेवली व डायरी काढली. डॉक सांगू लागले, तशा मी लिहू लागलो; डॉक ' 

"$C_{16}H_{12}FN_3O_3$" डॉकनी माझ्याकडे पाहिलं, "हे काय आहे माहितेय?"

मी नकारार्थी मान हलवली.

"फ्लुनिट्रेझेपाम! ऑदर नेम, रोहिप्नोल! हे औषध मोस्टली भूल देण्यासाठी व संमोहनासाठी वापरलं जातं. आपण जेव्हा राख पाहिली, तेव्हा ती पाहताना हे लक्षात येत होतं, की त्यावर पाणी मारण्यात आलं होतं. आता बघ; काही तर्क लागतोय

का?"

मी जरा डोक्याला ताण देवू लागलो. मला तो सिनॅरिओ इमॅजिन झाला. मी बोललो,

"जाळावर पाणी ओतून मोठया प्रमाणात धूर निर्माण केला गेला. ज्यायोगे तो पटकन वातावरणातील हवेत मिसळून जावा."

"बरोबर. पण आणखी एक कारण आहे पाणी वापरण्याचं! 'रोहिप्नोल' ही ग्रीन कलरची गोळी असते व ती गरम द्रव्यात पटकन विरघळते. गोळीमध्ये ब्लू कलरींग असते. ती जेव्हा विरघळते, तेव्हा ते द्रव्य निळे होते व हिरव्या रंगाचे अवशेष बाकी राहतात. हेच मिश्रण मग खून्यानं त्यानंच लावलेल्या आगीत ओतलं. आगीमुळं दोन कामं झाली. एक तर पाणी गरम झालं व दूसरं, पाण्यामुळं आग विझली गेल्यानं मोठया प्रमाणात धूर निर्माण झाला. समजलं? "

"हो डॉक! पाण्याचाही असा दुहेरीच वापर करण्यात आला आहे. एक तर गोळी लवकर विरघळवण्यासाठी त्याचा फायदा झाला व तेच पाणी आगीवर ओतून आग विझवली गेली. आणि त्यातील औषध धूरामार्फत वातावरणात पसरवण्यात आलं."

मी बोलतच सर्व डायरीत लिहीत होतो.

डॉक गंभीर होते. त्यांची नजर शून्यात होती. ते उद्‌गारले,

"आग आणि पाणी परस्पर विरोधी. एकमेकांचे शत्रूच; पण त्यांना मित्र बनवून आपल्या शत्रूचा काटा काढणारा हा मास्टर माईंड खूपच हुशार आहे असं दिसतंय!" आणि त्यांच्या चेहऱ्यावर

स्मित तरारलं.

सर्वजण ज्या व्यक्तीच्या बुद्धीची प्रशंसा करतात. त्या व्यक्तीला कोणा दूसऱ्याच्या बुद्धीची प्रशंसा करताना पाहून मला खूप आश्चर्य वाटलं. आणि तेही एका गुन्हेगाराच्या बुद्धीची. आपल्या राईव्हलची! असो -

डॉक काही विचार करत हॉलमध्ये बसले होते. मी त्यांच्या समोर बसलो होतो. भयाण शांतता पसरली होती.

"पंधरादिवसांपूर्वी 'गोविंदराव टेंबे रंगमंच' या नाट्यगृहात एका संगीत नाटकात काम करणारे सर्व कलाकार, तंत्रज्ञ, दिग्दर्शक आणि निर्माता सारेच जण एकाच वेळी मृत्यूमुखी पडले होते!" डॉक शांतता भंग करत बोलले,

"तो त्यांच्या मुहूर्ताचा प्रयोग होता. गोविंदराव टेंबेंच्याच 'संगीत जयदेव' या संगीत नाटकाचा तो प्रयोग होता. मला त्यांचं निमंत्रण होतं. प्रयोग चालू असतानाच नाटकाचा नायक उलटी करत खाली कोसळला. दिग्दर्शक व निर्माता माझ्या बाजूला होते. त्यांचीही अवस्था तीच होती. टेक्निशीअन्सही तसेच मरून पडले होते. आणि पुढे रंगमंचावर एक - एक करून सर्व खाली कोसळले. प्रयोग बंद पडला. सर्व प्रेक्षक पळून गेले.

मी जूना राजवाडा पोलिस स्टेशनला फोन करून इन्स्पेक्टरना तातडीनं तिथं येण्यास सांगितलं आणि इन्व्हेस्टीगेशन चालू केलं. म्हंटलं, ज्या अर्थी हे सर्व एकाचवेळी मरण पावले आहेत, त्या अर्थी यांची प्रयोगाआधी मिटींग झाली असणार; जेथे या सर्वांवर एकत्रित विषप्रयोग करण्यात आला आहे. मी लगेच बॅकस्टेज गाठलं. तेथे पाहणी करत असताना मला

टेबलवर ॲश ट्रे आढळून आली. ज्यात जळालेल्या सिगरेटस्‌ची थोटकं होती. त्याचवेळी बाहेरून बूटांचा आवाज आला. इन्स्पेक्टर नरहरी कापसे बॅकस्टेजला माझ्यापाशी आले. त्यांचं माझं कधीच पटत नाही. मी पोलिसांच्या कामात विनाकारण हस्तक्षेप करतो असे त्यांना वाटतं. त्यांनी मला तिथून निघून जायला सांगितलं. तरी मी लपवून एक सिगरेटचं थोटूक उचललं आणि तेथून बाहेर पडलो. प्रेक्षकगृहात व रंगमंचावर सर्व बॉडीज्‌चा पंचनामा चालू होता.

मी घरी येवून त्या सिगरेटची टेस्ट सुरू केली. त्यातील तंबाखूची रीएजंटशी रीॲक्शन करू लागलो. जेव्हा मी रिएजेंट $7_e$ 16% ॲक्वेअस्‌ हायड्रोक्लोरिक ॲसिड सोल्युशनशी व रिएजेंट $7_{bal}$ कोबाल्ट डाय थायोसायनेटशी सिगरेट मधील तंबाखूची रिॲक्शन केली, तेव्हा त्या मिश्रणाचा रंग निळा झालेला मला आढळला. याचा अर्थ मला त्यात ‘मेथॅक्वुअलोन’ आढळून आले. हे एक प्रकारचे ड्रग आहे. याच्या ओव्हर डोसमुळे उलटी, किडनी फेल होण्याची शक्यता असते. शिवाय माणूस कोमातही जावू शकतो. एवढेच नाही, तर हृदय वा फुफ्फूस बंद पडून मृत्यूही होवू शकतो!”

“डॉक, तुम्ही म्हणताय तसं सिगरेटमुळं जर मृत्यू झाला असेल, तर ज्या लोकांनी सिगरेटस्‌ पिली नाही त्यांचे काय? शिवाय ज्यांनी सिगरेटस्‌ पिली, त्या सिगरेटस्‌ मध्ये तरी कुठे ‘मेथॅक्वुअलोन’चा ओव्हर डॉस असणार आहे? मग; तरी सारे या ड्रगमुळे कसे मेले असतील?”

“मी मघाशी काय बोललो ते तू नीट ऐकले नाहीस. मी म्हणालो होतो, त्यांच्या मिटींगच्या वेळी त्यांच्यावर विष प्रयोग झाला

आहे. मला सांग, मिटींगमध्ये सहभागी लोक कसे बसतात?”

“एकमेकांजवळ...”

“बरोबर! म्हणजे जे कोणी सिगरेट ओढत होतं, त्यांच्या तोंडातून निघणारा धूर सर्वांनी श्वसन केला. ड्रगचा ओव्हर डोस नसला, तरी ते ड्रग थेट सर्वांच्या फुफ्फूसात पोहोचलं तो धूर एकाचवेळी सर्वांनी ग्रहण केल्यानं सर्वजण एकाचवेळी मरण पावले. आता मला सांगू शकशील; कोण सिगरेटस् पित होतं ते?”

“ज्या लोकांना उलटया झाल्या ते...”

“अगदी बरोबर! नाटकाचा नायक, दिग्दर्शक, निर्माता व म्युझिक अरेंजर यांनी सिगरेटस् पिल्या होत्या. मी लगेच माझ्या टेस्टचा एक रिपोर्ट तयार करून इन्स्पेक्टर कापसेंना पाठवून दिला, पण वैयक्तिक त्या केस् पासून दूरच राहिलो. तरीही अजूनही त्या केस्चा शोध कापसे घेत आहेत. वॉट अ शेम!”

“पण या केसचा व आपल्या केसचा काय संबंध?”

“तुला या खून करण्याच्या पद्धतीत आणि कॉन्स्टेबलला बेशुद्ध करण्याच्या पद्धतीत साम्य वाटत नाही? शिवाय आणखी एक खूप मोठं साम्य आहे!”

“ते कोणतं?” न राहून मी विचारले.

“ॲल्फ्रेड मॅक स्मिथ!”

“काय?” डॉक यांच्या या अनपेक्षित उत्तराने मला धक्काच बसला.

"होय! त्या संगीत नाटकाचे म्युझिक कंपोजर मि. स्मिथ होते. काही कामानिमित्त ते येऊ शकले नव्हते. म्हणून वाचले. कदाचित त्यांना मारण्यासाठीच खूनी त्यांच्या घरात शिरला असावा!"

"म्हणजे? स्टेला मॅम खूनी नाहीत?"

डॉकनी खून्याचा दूसऱ्यांदा उल्लेख केला होता. नक्की चाललंय काय? पुरावे तर मॅमच्या विरोधात आहेत...

पण माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता विचार करून डॉक पुढे म्हणाले, "आपल्याला मिसेस् स्मिथ यांना भेटायला हवे!" आणि ते उठले.

# (८)

डॉक गाडी चालवत होते. गाडीत; मी डॉकना विचारले, "डॉक, मॅडमना तुम्ही काय विचारणार आहात?"

"इन्स्पेक्टर जगतापनी मि. स्मिथ यांच्याबद्दल आपल्याला काय सांगितलं होतं?"

"हेच की रात्री ते स्वतःला कोंडून घेत. खोलीचं दार व खिडक्या ते आतून बंद करून घेत. "

"मग तुला अशी शंका नाही वाटली, की खोलीतील एक खिडकी उघडी कशी? ती सकाळी कोणी उघडली होती का हे मला त्यांना विचारायचं आहे."

"पण घरचा मालक मेलेला असताना खिडकी उघडण्याची शुद्ध कोणाला राहील?"

"माझाही तोच विचार आहे. पण आणखीही काही प्रश्न आहेत. कारण त्यांनी त्या एक्सपेरिमेंट करत असलेल्या रोपाबद्दल तर सांगितलं, पण इतर रोपांचा उल्लेखही केला नाही. याचा अर्थ माहितेय काय होतोय?"

मी नकारार्थी मान डोलावली.

"याचा अर्थ; त्यांचे काही सहकारीही आहेत. जे त्या इतर विषारी रोपांवर एक्सपेरिमेंट करत आहेत. इन्स्पेक्टरनीही स्टेला

यांच्या विद्यार्थ्यांचा उल्लेख केला होता हे विसरू नको.”

“म्हणजे; तुम्हाला म्हणायचंय, की स्टेला मॅम यांचा कोणी तरी सहकारी किंवा विद्यार्थी आहे, ज्याने खून करण्यासाठी त्यांना मदत केली?”

“आत्ताच काही सांगू शकत नाही!” डॉक पुढे पाहत म्हणाले.

(९)

आम्ही पोलिस स्टेशनला जावून इन्स्पेक्टर जगताप यांची परवाणगी घेतली व स्टेला मॅमशी बोललो. त्यांच्याकडून त्यांच्या काही अॅप्रेंटिसेस्‌ची नांवे व त्यांतील कोण - कोण, कोणकोणत्या वनस्पतीवर रिसर्च करत होते हे समजलं. मी सर्व डायरीत लिहून घेतलं. त्यावेळी डॉकनी खिडकी विषयीही विचारलं. कोणीही खिडकी न उघडल्याचं व ती आधी पासूनच उघडी असल्याचं मॅमनी सांगितलं. संभाषण चालू असताना डॉक सर्व माहिती का जाणून घेत आहेत हे त्यांनी मॅमना जाणवूही दिलं नाही. आम्ही माहिती घेवून इन्स्पेक्टर जगताप यांचा निरोप घेतला व तेथून बाहेर पडलो.

पोलिस स्टेशन बाहेर गाडीजवळ -

“खूनी यांपैकीच कोणी तरी एक आहे!” डॉक गाडीत बसत म्हणाले. मी ही त्यांच्या शेजारी बसलो.

डॉक गाडी चालवू लागले. गाडीत -

“डॉक, मॅमनी सारा दोष आपल्यावर ओढून घेतला याचा

अर्थ त्या कोणाला तरी वाचवू इच्छितात का?” मी विचारले.

“मेय् बी! पण त्याही गुन्हेगार आहेतच!”

“डॉक एक सांगू?” मी संकोचानं विचारलं.

“हं!”

“मला पी. एम्. रिपोर्टचा निष्कर्ष अजूनही समजला नाही... म्हणजे, रक्तात ट्रेमेडॉल तर आहे, पण पोटात दूध नाही. हे कसं?”

डॉक यांनी फक्त माझ्याकडं बघितलं आणि गाडी फिरवली.

# (१०)

थोड्यावेळाने आम्ही मि. स्मिथ यांच्या घरासमोर उभे होतो. डॉक मला स्मिथ यांच्या खोलीत घेवून गेले. आम्ही खिडकीपाशी थांबलो. डॉकनी पुढे झालेली ती खिडकी उघडली व मला खिडकीतून खाली बघायला सांगितलं. बाहेर, मातीत पाणी ओतल्यावर जसं वलय तयार होतं, तसे वलय तयार झालं होतं.

"आता लक्षात आलं?" डॉकनी माझ्याकडं पाहत स्माईल करत विचारलं.

"म्हणजे... मॅमनी दिलेलं दूध मि. स्मिथ यांनी घेतलंच नव्हतं?" मी गोंधळून डॉकना विचारलं.

"हो!" डॉक स्माईल करत म्हणाले.

"आणि तुम्हाला हे आधीपासूनच माहित होतं..." मी खूपच गोंधळलो होतो.

डॉकनी स्माईल करतच होकारार्थी मान डोलवली व म्हणाले,

"मि. स्मिथ हे स्टेला यांच्यावर रागावले होते. म्हणून ते त्यांच्या हातचे काही खायचे प्यायचे नाहीत. काल त्यांच्या नोकराकडूनच मला हे समजलं. जेवण तर स्वयंपाकीणच करायची; पण स्टेला रोज रात्री स्मिथना ग्लासभर दूध द्यायच्या. कदाचित त्यांचा राग दूर व्हावा असा त्यांचा उद्देश असावा. पण तो कधीच

दूर झाला नाही. ॲल्फ्रेड स्मिथ रोज रात्री खिडकी उघडून ते दूध बाहेर ओतून देत."

"जर तुम्हाला या खिडकीबद्दल माहित होतं, तर तुम्ही मॅमना याबद्दल का विचारलं?"

"त्यांना मि. स्मिथ हे खिडकी उघडायचे हे माहित आहे की नाही हे मला पाहायचं होतं. पण त्यांना याबद्दल काहीच माहित नाही. आणि दूसरं म्हणजे, उघडलेली खिडकी स्मिथ बंद करू शकतातच ना. म्हणून सकाळी दूसऱ्या कोणी ही खिडकी उघडली होती का, हे मला जाणून घ्यायचं होतं. पण तसं काही नाही. याचा अर्थ खून मध्यरात्री या खिडकीच्या बाहेरून झालाय. ही खिडकी रात्री उघडली जायची हे त्या खून्याला माहित होतं. तो संधीच्या शोधातच असणार म्हणा. खूप वेळ घेवून बनवलेला प्लॅन आहे हा. खूनी स्मिथ यांच्या पाळतीवरच होता. म्हणूनच घरातील कोणाला जी गोष्ट माहित नाही, ती त्याला माहित होती. म्हणजे ही खिडकी!"

"आणि ते ही खिडकी उघडीच का ठेवयाचे?"

"कदाचित हवा खेळती रहावी म्हणून."

"पण मग खूनीने खून केला कसा? तेही खिडकी बाहेरून? एवढया लांबून...?"

"आता ते तुझं तुच शोध. मी फक्त तुला एक क्लू देवू शकतो!"

मी मान डोलवली.

"मि. स्मिथ यांच्या शवाची पाहणी करत असताना मला

समजलं होतं, की त्यांच्या घशावर सूई घुसवण्यात आली होती. गोठलेल्या रक्ताचा ठिपका त्यांच्या श्वसननलिकेवर तयार झाला होता. तू वरवर पाहण्यात इतका दंग होतास, की म्हणून कदाचित तुझ्या ते लक्षात आलं नाही.”

“म्हणजे खिडकी उघडण्यासाठी ते आले तेव्हा कोणी तरी त्यांना सूई टोचली?”

माझ्या बोलण्यात खात्री नव्हती. कारण दिसतंय तितकं सगळं सोपं नाही, हे माझ्या लक्षात आलं होतं. कारण, तसं असतं, तर डॉकनी मला तर्क लावण्यास सांगितलंच नसतं. झालंही तसंच. डॉकनी माझा तर्क खोडून काढला. ते म्हणाले,

“खून्यानं असं केलं असतं, तर ते काय खून्याकडून गप सूई टोचून घेवून खूर्चीवर जावून बसतील? मि. स्मिथ यांनी आरडा ओरड नसती का केली? खून्याचा प्लॅन तर फसला असताच, शिवाय तो तक्षणीच पकडला गेला असता.”

“म्हणजे तुम्हाला म्हणायचंय, की खून्याने बाहेर उभारून आत आरामखूर्चीत झोपलेल्या मि. स्मिथ यांना विषारी सूई टोचली?”

“होय!”

“पण ते कसं शक्य आहे?” मी न राहून माझी अधीरता व्यक्त केली.

“आहे! बघ विचार करून.” डॉक स्मित करत मला म्हणाले.

“मग त्यावेळी सूई टोचल्यावर मि. स्मिथ यांनी आरडा ओरड का नाही केली?”

“ज्यावेळी त्यांना सूई टोचण्यात आली, तेव्हा ते गाढ झोपेत असणार हे सहाजिक

आहे. म्हणून कदाचित त्यांना डास वगैरे चावल्यासारखं वाटलं असेल.”

“पण तसं जरी असलं तरी त्यांनी डासाला मारण्याचा प्रयत्न केलाच असणार. मग त्यांच्या हाताला ती सूई का नाही लागली?”

“कदाचित लागलीही असेल, पण खून्याने ती मिळवली हे नक्की!”

“पण कसं?”

“होईल क्लीअर. सगळं मीच सांगू? मग तू काय इन्वेस्टिगेट करणार?”

मी घाबरलो. ते जरा कठोरपणेच बोलले होते. पण लगेचच त्यांनी नेहमी सारखं स्माईल केलं. ते माझी खेचत होते. पण मीही मुर्दाड आहे. मी पुन्हा बोललो,

“आणखी एक प्रश्न आहे. म्हणजे स्टेला मॅमनी मि. स्मिथ यांना मारण्याचा जो प्रयत्न केला, त्याबद्दल त्या खून्याला काही माहित नव्हतं?”

“नसणारच! तसं असतं, तर त्याने स्वतःहून खून का केला असता? पण दोघांमध्ये सतत भांडणं होत असतात ही गोष्ट खून्याला माहित होती. म्हणूनच तर त्यानं ‘अर्जेंटिना अल्टिसीमा’च्याच विषाचा वापर केला. जेणे करून पुढे जर इन्क्वायरी झाली, तर थेट संशय स्टेला स्मिथ यांच्यावर जाईल.”

“याचा अर्थ स्टेला मॅम निर्दोष आहेत. आणि ही गोष्ट तुम्हाला आधीपासूनच माहित होती.” मी नाराजीनं म्हणालो.

“हो! स्टेला यांना उघड्या खिडकीबद्दल काही माहित नाही हे तर सिद्ध झालंच आहे. तसं असतं, तर आपण दिलेलं दूध मि. स्मिथनी पिलं आहे याच भ्रमात त्या राहिल्या नसत्या. त्यांच्या जबाबावरून ते स्पष्टच झालंय. आणि जरी माहित असतं, तरी त्यांनी खूनाचा दूसरा अटेंप्ट केला नसता. कारण त्यांना त्यांच्या फूलप्रूफ प्लॅनवर पूर्ण विश्वास होता. आणि जरी अटेंप्ट केला असता, तरी गुन्हा कबूल करत असताना त्यांनी याबद्दल सांगितलं असतं. आणि त्यांना खिडकी बाहेरूनच खून करायचा असता, तर त्यांनी दूधात विष मिसळलंच नसतं. यावरून त्या खूनी नसल्याचं आधीच मला स्पष्ट झालं होतं.” डॉकनी निर्विकारपणे उत्तर दिलं.

आपल्या नाराजीचं सांत्वन होणार नाही हे लक्षात येवून मी पुढं विचारलं,

“मग तुम्ही स्टेला मॅमना अटक का करवलीत?”

“खरा खूनी गाफील रहावा म्हणून. आणि स्टेला स्मिथ सुरक्षित रहाव्यात म्हणूनही. मला माहित नाही तुझ्या लक्षात आलंय की नाही, पण ॲल्फ्रेड स्मिथ यांच्याशी ज्यांचा - ज्यांचा संबंध आला आहे, ते - ते मारले गेलेत. पुलिस चौकीपेक्षा अधिक सुरक्षित जागा त्यांच्यासाठी आताच्या घडीला कुठली असेल?

पण तरीही नमूद करण्यासारखी एक गोष्ट अशी, की प्रत्येकाचा मृत्यू झालेला नाही. असे असते, तर त्यांच्या घरातील नोकरांवरही जीव गमावण्याची वेळ आली असती. पण त्यांनी म्युझिक दिलेल्या नाटकातील सर्वांना मात्र मारण्यात आले आहे.

याचा अर्थ स्मिथ यांच्याकडील कंपोजिशन्स्चा याच्याशी संबंध असण्याची शक्यता आहे. त्या कंपोजिशनस्शी ज्यांचा संबंध आला तेच फक्त मारले गेलेत. आणि स्मिथही मेलेत म्हणून घाबरण्याचं कारण नव्हतं. तरी स्टेला यांच्या बाबतीत मला कोणतीही रिस्क घ्यायची नव्हती. त्यांचं नातं कसं ही असलं, तरी ते नवरा बायको होते. म्हणूनच मला स्टेला यांची काळजी वाटत होती."

माझ्या डोकयातील गुंता आता सुटत आला होता. पण तरी एक प्रश्न मनात डोकावत होताच. मला धीर होत नव्हता. तो प्रश्न मी लगेच डॉकना विचारला,

"मि. स्मिथ यांचा स्टेला मॅमवर असा कोणता मोठा राग होता, की त्यांनी त्यांच्या हातचं खाणं - पिणं ही टाकलं होतं?"

ज्या टेबलवर ग्रामोफोन होता त्या टेबलकडे डॉकनी अंगुलीनिर्देश केला.

"ती डायरी घेवून ये!" डॉक मला म्हणाले.

मी टेबलकडे जावून तेथील डायरी घेवून पुन्हा डॉकपाशी आलो.

"५ जानेवारीच पान बघ!" डॉकनी मला सांगितलं.

मी डायरी पाहू लागलो. डायरी वरून माझ्या हे लक्षात आलं, की लिंडा नावाच्या एका स्त्रीचा नरेंद्र सुकुमार पोवार नांवाच्या व्यक्तीशी संबंध असल्याचं मि. स्मिथ यांच्या लक्षात आलं होतं.

"या लिंडा कोण?" मी डॉककडे पाहत त्यांना विचारलं.

"तू ऐकत नाहीस बघ. ऐकणं ही कला आहे. आणि ती

प्रत्येकाला आलीच पाहिजे. ही एकच कला अशी आहे जी सहज साध्य होणारी आहे. बी अ गुड लिसनर फस्ट. मी काल नोकरांशी इन्टरॅक्ट करताना ऐकून न घेता तू फक्त बोलत होतास."

"पण तुम्हीच तर मला बोलायला सांगितलं होतं." मी जरा नाराजच झालो.

"हो. पण तेव्हा नाही जेव्हा कोणी दूसरं बोलत असतं. हे तुला कळायला हवं. आता हा थर्ड लेसन लक्षात ठेव."

"सॉरी डॉक. पण या लिंडाचा आणि मि. स्मिथनी स्टेला मॅमवर नाराज होण्याचा काय संबध डॉक?"

"मि. स्मिथ स्टेला यांना प्रेमानं लिंडा असं म्हणायचे."

"लिंडा?"

"हं. स्पॅनिशमध्ये याचा अर्थ सूंदर असा होतो." डॉकनी माझी शंका दूर केली.

"मग तर मि. स्मिथ स्टेला मॅमवर खूप प्रेम करायचे असं दिसतंय. तरी मॅमनी असं..."

माझ्या लक्षात आलं, की याच कारणावरून ते स्टेला मॅमना मारत असणार. म्हणूनच स्टेला मॅमनी मि. स्मिथ यांना ठार मारले.

"मला वाटलं नव्हतं स्टेला मॅम अशा असतील..." मला धक्का बसला होता. मी अंर्तमुख होवून बोलून गेलो.

"केवल; कधीही कोणत्याही व्यक्तीबद्दल संपूर्ण माहिती जाणून घेतल्याशिवाय आपले मत कधी बनवू नये! मागची पानं बघ!"

डॉकनी जवळ - जवळ मला दरडावलेच. मी डायरीची मागची पानं बघू लागलो. डॉक बोलत होते,

"दोघांच्या लग्नाला २५ वर्षे झाली आहेत. तरी त्यांना मूल नाही. हे या डायरीवरून स्पष्ट होतं. १ जानेवारीच्या पानावर त्यांनी त्यांचं हे दुःख लिहून ठेवलंय. विचार कर केवल, वर्षाच्या सुरूवातीला डायरीत हा व्यक्ती जर आपलं दुःख  लिहून ठेवत असेल, तर तो किती हताष असेल! त्यांनी तर आशाही सोडली होती. आश्चर्य नाही की मि. स्मिथ रात्री स्वतःला कोंडून घेत. त्यांनी तर कारणाशिवाय बाहेर जाणंही सोडलं होतं. असो; दोष स्टेला स्मिथ यांच्यात आहे. यामुळंच त्यांना आपत्य होवू शकलं नाही म्हणून मि. स्मिथ स्टेला यांच्यावर चिडून होते. यामुळंच ते स्टेला यांच्याशी शुल्लक कारणांवरूनही भांडत असणार. त्यांना मारत असणार. अशावेळी स्टेला यांनी बाहेर स्वतःसाठी आधार शोधला, तर त्यात गैर काय आहे? चूक कोणाचीही नव्हती. दोष होता तो त्यांच्यातील विसंवादाचा!"

"सॉरी डॉक!" मी डायरी पाहून बंद केली.

"आता पुढचा प्लॅन?" मी डॉककडे पाहत विचारलं.

"युनिव्हर्सिटी!" ते खिडकी बाहेर पाहत उद्गारले.

आम्ही मि. स्मिथ यांच्या बंगल्यातून बाहेर पडलो.

आम्ही दोघांनी युनिव्हर्सिटी गाठली. तेथे स्टेला मॅमच्या ॲप्रेन्टीसेस्‌ची चौकशी केली. ऑफिसमधून सर्वांची योग्य ती माहिती मिळाली. डॉकचं युनिव्हर्सिटीत येणं - जाणं असल्यानं आम्हाला जास्त त्रास झाला नाही. त्या नंतर डॉक मला एका व्यक्तीकडं घेवून गेले. ते युनिव्हर्सिटीच्या बोटनी डिपार्टमेंटचे हेड होते. दिसायला आकर्षक. वय ४० - ४५ च्या आसपास. नांव; 'नरेंद्र सुकुमार पोवार'! हो तेच!

डॉकनी त्यांना मि. स्मिथ गेल्याचं सांगितलं व स्टेला मॅम विषयी काही प्रश्न विचारले. पोवार सरनी सांगितलं ते मि. स्मिथ यांच्या डायरीशी तंतोतंत जुळत होतं. पण त्यांनी अशाही काही गोष्टी सांगितल्या, ज्या मि. स्मिथ यांच्या डायरीत नव्हत्या. त्यांनी सांगितलं, की त्यांचं व स्टेला मॅम यांचं नातं भावनिक आहे. पण मि. स्मिथ यांनी त्याचा चूकीचा अर्थ घेतला...

"एक दिवस स्टेला युनिव्हर्सिटीत आली नाही म्हणून मी तिच्या घरी गेलो होतो. ती घराबाहेरच मला भेटली. तीच्या डोळयांत पाणी होतं. आल्या आल्याच तीने मला मिठी मारली आणि जोरजोरात रडू लागली. माझ्या लक्षात आलं, की पुन्हा दोघांमध्ये वाद झाला असणार. त्यावेळी स्मिथही घरी होते. त्यांनी मला व स्टेलाला एकत्र पाहिलं. स्टेला भीतीने दूर झाली. त्यांच्या डोळयांतला स्टेला विषयीचा राग अधिकच बळावला. ते रागाने

आमच्या जवळ आले. माझ्याकडं एक जळजळीत कटाक्ष टाकून त्यांनी स्टेलाला हाताला धरून फरफटत घरात नेलं. जाताना ती आशेनं माझ्याकडं पाहत होती. पण नवरा - बायकोमध्ये पडण्याचा नैतिक अधिकार मला नव्हता. मी हताष तिथं उभा राहिलो...

मी तिथंच उभा होतो. आतून स्मिथने मारण्याचे व स्टेलाने ओरडण्याचे आवाज येत होते! मी फक्त तीला भावनिक आधारच देवू शकत होतो. या उपर माझ्या हाती काही नव्हतं..."

बोलताना त्यांचे डोळे पाण्यानं भरून आले होते. कंठ दाटून आल्यानं आवाज धीर गंभीर आणि जड झाला होता. डॉकनी माझ्याकडं पाहिलं. मी शर्मेनं मान खाली घातली. डॉक पोवार सरना धन्यवाद देऊन बाहेर पडले. मी त्यांच्या मागून गेलो. माझ्या लक्षात आलं होतं, की विद्‌यार्थ्यांची चौकशी करणं हे तर दूय्यम कारण होतं.

कारण काल तर ते विद्‌यार्थी घरात हजर असून त्यांनी कोणाचीच चौकशी केली नव्हती. हे त्यांनी इंटेशनली केली होती का?

पण इथं येण्यामागचा डॉकचा विचार पोवार सरनाच भेटणं हाच होता. डायरीत नमूद केलेली व्यक्ती ती हीच आहे हा डॉकनी कसा अंदाज बांधला याचे मला आश्चर्य. कारण एका नांवाच्या अनेक व्यक्ती असतातच ना. मी तसे डॉकना विचारलेही. डॉकनी खुलासा केला,

"आपलं नातं त्याच व्यक्तीशी जुळतं ज्याच्याशी आपला वारंवार संपर्क येतो व सहवास निर्माण होतो. स्टेला यांची ज्या माणसाशी जवळीक निर्माण झाली, ती नक्कीच त्यांच्या सततच्या

संपर्कात असणार हे स्पष्ट होतं. त्यांचं युनिव्हर्सिटीत येणं असल्यानं व त्या बोटनीच्या अभ्यासक असल्यानं साहजिकच त्यांचा नरेंद्रशी वरचेवर संपर्क येत असणार. हा माझा तर्क. कारण डायरीत नांव तर स्पष्टच होतं!"

डॉक व मी गाडीत बसलो.

"डॉक, तुमच्या मते खूनी मॅमच्या ॲप्रेंटिसेस्‌मधीलच कोणी तरी आहे; पण आपल्याला येथे मिळालेली माहिती तर साधारणच आहे. आता यावरून आपण खूनी कसा शोधणार?"

मी शंका व्यक्त केली. पण डॉक काही बोलले नाहीत. त्यांनी फक्त स्माईल केलं. डॉक गाडी चालवत होते. पण रस्ता डॉक यांच्या घराकडे जाणारा नव्हता.

"आपण कुठं चाललोय?" मी विचारलं.

"माझ्या प्राथमिक शाळेतील शिक्षकांकडे. त्यांना बऱ्याच क्षेत्राचं ज्ञान आहे. ते आपल्याला या केसमध्ये मदत करू शकतील. खूनी कोण आहे हे तर आपल्याला कळेलच. पण आत्ता आपल्याला ॲल्फ्रेड यांचा भूतकाळ जाणून घेणं अधिक महत्त्वाचं आहे. या भूतकाळातच त्यांच्या खूनाचं कारण दडलं आहे. आणि तो भूतकाळ माझे शिक्षक आपल्याला सहज सांगू शकतील." त्यांनी माझ्याकडं पाहिलं व स्मित केलं,

"तुला पटणार नाही, पण अशा बऱ्याच गोष्टी आहेत, ज्या मलाही माहित नाहीत, पण त्यांना माहित आहेत! तुमचं इंटरनेटही काही नाही त्यांच्यासमोर!"

आणि ते पुढे पाहून गाडी चालवण्यात मग्न झाले. डॉक ज्या व्यक्तीबद्दल इतकं भरभरून बोलताहेत ती व्यक्ती नक्कीच प्रतिभा संपन्न आणि विलक्षण असली पाहिजे. म्हणून त्यांच्या सरांना भेटण्याची मला खूपच उत्सुकता वाटू लागली.

मी खिडकीतून बाहेर पाहत होतो. बाहेर पाहत असताना मला दिसलं, की एका घराच्या बाहेर पायऱ्यांवर २ मूले बसली होती. ती कलिंगडाचा आस्वाद घेण्यात दंग होती व कलिंगडाच्या बिया थुंकून कोणाच्या बिया किती लांब जातात हे पाहत होती.

आम्ही विक्रमनगरला डॉक यांच्या शिक्षकांच्या घरी पोहोचलो. भिंतीवर नांवाची पाटी -

'विदुर सहस्रबूद्धे.'

आम्ही घरात प्रवेशकर्ते झालो. ते सोफ्यावर कसलं तरी पुस्तक वाचत बसले होते. अंगात सूती कुर्ता होता. उन्हाळा असल्यानं बाहेर दुपारची हवा तापली होती. पण तरी त्यांनी एक पातळ शालही अंगावर पांघरली होती. मला याचा अर्थच कळाला नाही. म्हणजे; त्यांना नेमकं उकडतंय की थंडी वाजतेय तेच मला समजत नव्हतं. त्यांच्या डोळयांना चष्मा होता. केस पण पिकले होते. ते डॉकपेक्षा काही जास्त मोठे नव्हते. दोघांच्यात अंदाजे १३-१५वर्षांचं अंतर असेल. पूर्वी '७ वी' पास व्यक्तीही शिक्षक होवू शकत असे असं मला माझ्या बाबांनी सांगितलेलं मला आठवलं. त्यांनी पुस्तक बंद करून वर आमच्याकडं पाहिलं. मोस्टली माझ्याकडचं. ते मला म्हणाले,

"तुला आत्ताच एक महत्त्वाची गोष्ट सापडली आहे. कदाचित, तुझ्या प्रश्नाचं उत्तर!"

त्यांचा अंदाज डॉक सारखा अगदी तंतोतंत बरोबर होता. डॉकनी माझ्या समोर उपस्थित केलेल्या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं होतं आणि त्याचा आनंद माझ्या चेहऱ्यावर होता आणि तोच त्यांनी वाचला होता.

समोरच्याला कोड्यात टाकण्याची आपल्या विद्यार्थ्यांची

सवय विदुर सरना माहित असणार हे माझ्या चटकन लक्षात आलं आणि मला हसू आलं. मी ते तोंडातच दाबलं. पण हे विदुर सरांच्या लक्षात आल्यानं तेच मोठयानं हसू लागले. त्यांनी आम्हाला जवळ बोलावलं आणि बसण्यास सांगितलं. डॉक त्यांना नमस्कार करून त्यांच्या समोर बसले. मीही त्यांच्या जवळ जावून त्यांना नमस्कार केला व माझं नांव सांगितलं,

"नमस्कार, मी केवल श्यामसत्य उपाध्याय."

माझं नांव ऐकून त्यांचा चेहरा खुलला. चेहऱ्यावर स्मित व डोळयांत चमक जाणवली. माझ्या पाठीवर हात ठेवत ते म्हणाले,

"याच्या नांवात एक शाश्वत सत्य दडलंय बली. तुझ्या लक्षात आलंय?"

विदुर सर डॉकना बली म्हणतात. ऐकून मला हसू आलं. साहजिक आहे. ते त्यांच्या शिक्षकांना सांगू शकले नसणार, 'कॉल मी डॉक म्हणून'. अगदी कोणालाही न घाबरणारे डॉक, पण त्यांचे त्यांच्या सरांसमोर मात्र काही चालत नाही.

त्यांच्या विचारण्यावर डॉकनी स्मित करत होकारार्थी मान डोलावली.

विदुर सर पुढं बोलले,

"केवल श्यामसत्य! फक्त कृष्ण हेच सत्य आहे! छान. छान!"

असं म्हणून त्यांनी मला हाताला धरून आपल्या जवळ बसवलं. आणि हसत त्यांनी प्रेमानं माझ्या पाठीवरून हात

फिरवला. तेव्हा पहिल्यांदाच माझ्या नांवात असलेली मजा माझ्या लक्षात आली. मी त्यांच्या जवळ बसलो त्यावेळी त्यांनी बंद करून डाव्या हातात धरलेलं पुस्तकाचं मूखपृष्ठ मला दिसलं. ते 'भाल. जी. पेंढारकर' यांचं आत्मचरित्र 'साधा माणूस' वाचत होते.

डॉकनी माझी व त्यांची ओळख करून दिली. मी घरावर नजर फिरवत होतो. इथेही विदुर सर डॉक सारखे एकटेच राहत असल्याचं माझ्या लक्षात आलं.

'सगळी विद्वान व मोठी माणसं आयुष्याच्या हया टप्प्यात असी एकाकी का होतात?' असा प्रश्न माझ्या मनात चमकून गेला. आणि मी त्या विचारात हरवून गेलो.

डॉकनी त्यांना ॲल्फ्रेड स्मिथ यांच्याबद्दलची माहिती विचारली. कालचा सर्व प्रकार त्यांना आधी पासूनच माहित होता. डॉक येणार हे पक्कं माहित असल्यासारखं त्यांनी मि. स्मिथ यांच्याबद्दलची संपूर्ण माहिती आधीच काढली होती कदाचित. त्यांनी सांगण्यास सुरूवात केली. मी डायरी काढून लिहू लागलो.

"ही घटना चालू झाली ती एकोणीस वर्षांपर्वी. ॲल्फ्रेडला शास्त्रीय संगीताची ओढ होती. त्यातल्या त्यात 'जयपूर अत्रौली' घराण्याची. तो 'उस्ताद केशीदास' यांच्याकडे शिकायला होता. पण ७ वर्षांनंतर तो त्यांचे कंपोजिशन्स् घेवून पळून गेला. केशीदासांना दोन मुलं. भैरव आणि मल्हार. त्यातील लहान मुलगा मल्हार, हा शिक्षकांसाठी बाहेर होता. मुंबईला. तो जास्त इकडं यायचा नाही. भैरव मात्र केशीदांच्या हाताखाली तयार झालेला. तो त्यांना गाण्यात साथ देई. ॲल्फ्रेड सोबतच तो रियाज करी. ॲल्फ्रेड जेव्हा कंपोजिशन्स् चोरून पळून गेला, तेव्हा भैरवच त्याच्या विरूद्ध कोर्टात गेला. पण सबळ पुरावा नसल्याने तो ती केस् हरला.

पुढे केशीदासनीही घरात गळफास लावून आत्महत्या केली.

ॲल्फ्रेडने चोरी केल्याचं त्यांना दुःख नव्हतंच. त्यांना दुःख होतं ते त्यानं, त्यांच्या सर्वात प्रिय शिष्यानं त्यांच्याशी केलेल्या प्रतारणेचं! भैरवला जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा त्यानं बसल्या जागी प्राण सोडला. केशीदास हे भैरवसाठी पित्यापेक्षा एक गुरू म्हणून अधिक जवळचे होते. किती मोठी ही गुरू भक्ती! किती मोठी ही गुरूवरची श्रद्धा! मला वाटतंय, की एवढी माहिती तुझ्यासाठी पुरेशी आहे." डॉककडं पाहत त्यांनी स्मित केलं.

खून कोणी केला हे त्यांना जणू माहितच आहे असा त्याच्या हसण्यावरून मला अर्थबोध होत होता. डॉकनाही ते जाणवलं. पण त्यांनी कसलाही प्रश्न केला नाही. त्यांनी फक्त विदुर सर यांचे आभार मानले. आम्ही त्यांना पुन्हा नमस्कार केला. त्यांनी मला पुन्हा येण्यास सांगितलं. मी त्यांना परत येण्याचं आश्वासन दिलं व आम्ही तेथून बाहेर पडलो.

"तू सरांना खूप आवडलेला दिसतोयंस. कारण ते सहसा असं कोणाशी इतकं बोलत नाहीत. जे त्यांना आवडतात, त्यांच्याशीच ते एवढया आस्थेनं बोलतात." डॉक हसत मला बोलले. माझ्या चेहऱ्यावर आनंदाची लकेर उमटली. पण लगेच...

" आता मला तुझी भीती वाटायला लागली आहे. सरांच्या जवळचा फक्त मी एकटाच होतो. तू माझी जागा घेणार आता. मला एकटयाला पाडणार..."

डॉक हे मला चिडवण्यासाठी बोलले हे माझ्या लक्षात

आलं होतं. म्हणून मी काही प्रतिक्रिया दिली नाही, पण आश्चर्य मात्र वाटलं. कारण एवढया गंभीर प्रकरणात देखील ते माझी चेष्टा करत होते. इतका तटस्थपणा त्यांच्यात येतो कोठून याचं आश्चर्य वाटलं मला!

डॉक ड्राईव्ह करत होते. म्हणाले,

"आपल्याला आता घरी जायला हवं. एव्हाना आपला एक महत्त्वाचा पाहूणा घरी आपली वाट बघत बसला असेल!"

त्यांच्या बोलण्यात ठामपणा होता आणि चेहऱ्यावर स्मित. डॉक जे बोलले ते मला काही समजलं नाही. पण आता काही प्रश्न न करता मी गप्प बसलो होतो. विदुर सरांबद्दल मी विचार करत होतो. डॉक त्यांच्याकडं येणार हे त्यांना आधीच माहित होतं. आणि हे मला ते वाचत असलेल्या भालजी बाबांच्या आत्मचरित्रावरून लक्षात आलं होतं. माझा विचार चालू असताना डॉकनीही मला तोच प्रश्न विचारला,

"तुझ्या लक्षात आलं? त्यांना माहित होतं आपण त्यांच्याकडं येणार हे."

"हो. त्यामुळंच ते आपल्यासाठी माहिती गोळा करत होते." मी उत्तरलो.

डॉकनी माझ्याकडं पाहिलं,

"तुझ्या हे कसं लक्षात आलं?" त्यांनी मला प्रश्न केला.

"सर 'साधा माणूस' वाचत होते. यावरून मला समजलं.

भालजी बाबा हे पंडीत अल्लादियाँ खाँ साहेबांचे शिष्य आहेत. त्यांनी जेव्हा सातवी नंतर घर सोडलं, तेव्हा ते त्यांचा मुलगा पंडीत भूर्जी खाँ साहेब यांच्याकडं रहायलाही होते."

"इंप्रेसिव्ह! वेरी गूड!" डॉक हसत म्हणाले,

"तुला महितेय, गोविंदराव टेंबे देखील पंडीत अल्लादियाँ खाँ साहेबांचेच शिष्य!"

"हा... म्हणूनच त्या नाटक कंपनीने मि. स्मिथ यांच्याकडून संगीत कंपोजिशन्स् घेतली. हो ना?"

"बरोबर!"

आमची गाडी जोराने डॉकच्या घराच्या दिशेनं धावू लागली...

(१३)

आम्ही डॉकच्या घरी पोहोचलो तेव्हा पाहिलं; कुलूप तुटलं आहे. मी काळजीत पडलो. पण डॉक शांत होते. जणू त्यांना याबद्दल आधीपासूनच माहित होतं. ते आत गेले. त्यांच्या मागून मीही आत गेलो.

पाहिलं तर आत एक ४0-४५ वर्षांचा इसम बसला होता. मला आठवलं, की काल स्टेला मॅमच्या विद्‌यार्थ्यांमध्येही हा उभा होता. घरातील सर्व वस्तू विस्कटल्या गेल्या होत्या. त्यानं घरात शोधाशोध केली होती हे स्पष्ट होतं. डॉक काही न बोलता आतल्या खोलीत गेले.

थोड्यावेळानं बाहेर आले. तेव्हा त्यांच्या हातात ग्रामोफोन होता.

हो! ग्रामोफोन! तोच ग्रामोफोन! ॲल्फ्रेड मॅक स्मिथ यांचा! मला सुचणंच बंद झालं.

त्यांनी तो ग्रामेफोन त्या इसमासमोर टी-पॉयवर ठेवला. बाजूलाच एक परमवीरचक्र पडलं होतं. स्ट्रेन्ज! काल तर हे इथं नव्हतं.

डॉकही त्याच्यासमोर सोफ्यावर बसले. इसमानं तो ग्रामोफोन त्याच्याकडे खेचला. डॉकच्या चेहऱ्यावर स्मित होतं. ते मला म्हणाले,

"अरे केवल, तू उभा का? बस ना!"

मी डॉक व टी-पॉय यांच्यामधून वाट काढत त्या इसमाच्या व डॉक यांच्या मध्ये सोफ्यावर जावून बसलो. त्या इसमानं एव्हाना ग्रामोफोनची पाहणी करून त्याच्या खालचा छूपा कप्पा उघडला होता व त्यातून काही कागद बाहेर काढून तो पाहत होता. ते कागद म्हणजे म्युजिक कंपोजिशन नोटस् होत्या! नोटस् पाहून शांतपणे त्याची उरळी करून त्याने ते नीट आपल्या खिशात ठेवून दिले.

"हेच हवं होतं ना तुला? याच्यासाठी एवढं मोठं हत्याकांड केलंस ना तू मल्हार?!" डॉक गंभीरपणे बोलले.

"म्हणजे...?" भीतीने मी एवढंच बोलू शकलो.

"होय केवल! हाच आहे तो खूनी!"

डॉक यांच्या बोलण्यात जरब व कठोरता सहज जाणवत होती. असं त्यांना पाहण्याची माझी ही पहिलीच वेळ. त्यांच्या आवाजाने मीही घाबरलो होतो. पण मल्हारवर त्याचा काही परिणाम झाला नाही. डॉकनी मोर्चा मल्हारकडं वळवला.

"बोल!"

"माझ्या बापानं, गळफास लावून आत्महत्या केली आणि याला जबाबदार होता स्मिथ!" मल्हार त्वेषानं बोलून लागला,

"बाबांच्याकडं त्यांच्या कंपोजिशनच्या राईटस् नसल्यानं माझा भाऊ कोर्टात त्याच्यासमोर हरला. त्यावेळी मी साऊथ आफ्रिकेत आदिवासी पाड्यांत प्रॅक्टिस करत होतो..."

"ओह आय सी..." माझ्या तोडून आपसूकच निघाले.

तसे डॉकनी स्माईल करत माझ्याकडं पाहिलं.

मल्हार पुढं बोलू लागला,

"घडला प्रकार दादाकडून कळला. बाबांना आधार द्यावा म्हणून मी कोल्हापूरला परत आलो तर माझे बाबा माझ्या डोळयासमोर तुळीला लटकत होते. आणि बाजूलाच माझा भाऊ निपचित पडला होता. वाटलं तेव्हाच संपवून घ्यावं स्वतःला; पण... पण; ॲल्फ्रेड जीवंत होता. ॲल्फ्रेडला त्याच्या करणीची शिक्षा दिल्याशिवाय मरणं माझ्या बुद्धीला मान्य नव्हतं! आणि तेव्हाच मी ॲल्फ्रेडला ठार मारण्याचा निश्चय पक्का केला!!!"

"म्हणून तू आधी स्मिथची सर्व माहिती काढलीस. तुला कळंल, की स्मिथची बायको स्टेला ही युनिर्व्हसिटीत प्रोफेसर म्हणून काम करत आहे. नांव बदलून युनिर्व्हसिटीत प्रवेश मिळवलास. जेणे करून तुला स्टेला स्मिथ यांच्या घरात प्रवेश मिळवता आला. बरोबर ना?"

"हो!" तो पुन्हा त्याच त्वेषाने बोलू लागला. त्याच्या बोलण्यात उन्माद जाणवत होता,

"मी एम्. बी. बी. एस्. आहे... त्यामुळं युनिर्व्हसिटीत ॲडमिशन घेणं मला अवघड नव्हतं. फोटोशॉपच्या सहाय्यानं मी सगळी कागदपत्रं नांव बदलून नव्यानं बनवून घेतली आणि

युनिव्हर्सिटीत बॉटनी डिपार्टमेंटमध्ये पी. एच्. डी. साठी ॲडमिशन घेतली!"

"आणि स्टेला स्मिथ यांना ॲप्रेंटिस म्हणून जॉईन झालास!"

दोघांचं बोलणं चाललं होतं. वाटत होतं जणू दोन समशेरी रणांगणात झुंजत आहेत. मी थोडा घाबरलेलो होतो. पण मानतला प्रश्न मला शांत बसू देईना. मी मध्येच मल्हारला विचारलं,

"तुम्हाला मि. स्मिथ यांना मारायचंच होतं, तर डिरेक्टली का नाही मारलं?"

"कारण याला आधी कंपोजिशन्स् शोधणं गरजेचं होतं. म्हणून यानं प्रथम स्मिथ यांच्या घरात एन्ट्री मिळवली. शोधाशोध चालू केली. त्याचवेळी याला समजलं, की स्मिथ यांनी ते कंपोजिशन्स् एका नाट्य निर्मात्याला विकले आहेत. या संतापातूनच यानं त्या नाटकातील सर्वांनाच ठार मारलं. पण याला अजून कंपोजिशन्स्च्या ओरिजिनल नोटस् सापडल्या नव्हत्या. म्हणून यानं स्मिथ यांना जीवंत ठेवलं!"डॉकनीच माझ्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

"हो. तो नाट्यगृहात वेळानं पोहोचावा म्हणून मीच त्याची कार पंक्चर केली होती. त्याला पब्लिक ट्रान्सपोर्टनं प्रवास करणं आवडत नाही हे मला माहित होतं."

"ओह! तर म्हणून नाटकाच्या मुहूर्ताला यायला त्यांना उशीर झाला होता."

"तुम्ही ती सिगरेटस् त्या लोकांपर्यंत पोहोचवलीत कशी?" मी पुन्हा इन्टरप्ट केलं.

"त्यांच्या नेहमीच्या दुकानदाराला चार पैसे देवून त्याला हे काम करण्यासाठी मॅनेज करणं असं कितीसं अवघड आहे केवल!? काही दिवस मि. स्मिथवर पाळत ठेवल्यावर याला समजलं, की ज्या नोटस् हव्या आहेत, त्या स्मिथनी त्यांच्या ग्रामेफोनमध्ये दडवल्या आहेत."

बोलतच डॉकनी खिशाकडं हात नेला. पण त्याचवेळी मल्हारनं चाकू बाहेर काढला आणि मला जवळ ओढून माझ्या गळयाला लावला.

"मला माहितेय तुमच्या डोक्यात काय चाललंय! खबरदार पोलिसांना फोन लावलात तर! मला माहितेय तुम्ही माझ्याविरोधात एव्हिडेंस गोळा केलेत. तुम्हाला शोधायला मला वेळ लागला; पण संपवायला अजिबात वेळ नाही लागणार!"

बोलतच तो मला धरून उभारला व डॉकच्या दिशेने मला घेवूनच चालू लागला. त्याला डॉकनाही संपवायचं होतं आता. त्याचा चाकू अजूनही माझ्या गळयावर होता.

मी प्रसंगावधान राखून माझं डोकं मागे त्याच्या नाकावर आदळलं. त्याला अतीव वेदना झाल्यानं त्यानं मला सोडून दिलं. तसे डॉक उठले व त्यांनी मल्हारला पकडलं. आता आपली धडगत नाही हे लक्षात घेवून मल्हार स्वतःला सोडवून घेवून पळून गेला. डॉक त्याच्या मागून पळाले. मीही मागून गेलो.

रस्त्यावर; डॉक मल्हारचा पाठलाग करत होते. मी त्यांच्या मागे होतोच. डॉकनी मल्हारला पकडलं. दोघांत हातापाई

झाली. शेवटी डॉकनी मल्हारवर विजय मिळवला. काही माणसंही डॉकच्या मदतीला धावली आणि त्यांना मल्हारला धरून ठेवलं. मी त्यांच्यापाशी पोहोचलो. डॉकनी मोबाईल काढून माझ्याकडे दिला व इन्स्पेक्टर जगतापना फोन लावून ते कोठे आहेत हे बघण्यास सांगितलं. इन्स्पेक्टर जगताप चौकीवरच होते. माझं बोलणं चालू होतं तेवढयात डॉक गाडी घेवून आले.

“चौकीवर आहेत.” मी डॉकना सांगितलं.

डॉकनी मल्हारना गाडीत कोंबले.

(१४)

आम्ही मल्हारला घेऊन लक्ष्मीपूरी पोलिस चौकीवर पोहोचलो.

"हा कोण?" इन्स्पेक्टरनी विचारलं.

"अ‍ॅल्फ्रेड स्मिथ यांचा खरा खूनी!" डॉकनी खुलासा केला.

"म्हणजे स्टेला स्मिथ या खूनी नाहीत?" इन्स्पेक्टरना धक्काच बसला.

"पी. एम्. रिपोर्टवरून ते सिद्ध नाही का झालं?" डॉकनी हसत उत्तर दिलं.

"डॉक; तुम्ही कधी काय कराल आणि काय बोलाल, याचा काही नेम नाही..." इन्स्पेक्टर हसून खूर्चीतून उठत म्हणाले.

त्यांनी कॉन्टेबलला सांगून मल्हारला सेलमध्ये बंद केलं आणि स्टेला मॅमना मुक्त करवलं. त्यानंतर आम्ही मॅमना घेऊन त्यांच्या घरी जावू लागलो. इन्स्पेक्टरही आमच्या सोबत आले. घडला प्रकार जाणून घेण्याची त्यांची खूपच इच्छा होत आहे हे जाणवत होतं.

डॉक गाडी चालवत होते. मी शेजारी होतो. मागे मॅम व इन्स्पेक्टर. डॉकनी मॅमची माफी मागतली.

“सॉरी! तुम्ही गुन्हेगार नसतानाही मी तुम्हाला अटक करवली. पण हे करणं तुमच्या सेफ्टी साठी गरजेचं होतं!”

“इटस् ऑलराईट...” एवढंच मॅमचं डॉकना उत्तर होतं.

त्या खूप नाराज होत्या. बहुतेक आपण केलेल्या कृत्याची त्यांना शरम वाटत असावी... मी तर निःशब्दच होतो. फक्त खिडकीतून बाहेर पाहत होतो. माझी नजर साईड मिररवर पडली. माझ्या मागे इन्स्पेक्टर बसले होते. ते मला मिररमध्ये दिसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर मात्र सर्व प्रकार जाणून घेण्याची अधीरता स्पष्ट दिसत होती.

(१५)

मि. स्मिथ यांच्या खोलीत -

डॉक, मी व इन्स्पेक्टर बसलो होतो. डॉक बोलत होते,

"काल मध्यरात्री मी सहज एक फेरी मारावी म्हणून इकडं आलो होतो. नेमकी त्यावेळी ती शेकोटी विझली असल्याने मला ती रात्री दिसली नाही. पण ती विझली गेली असल्यानेच मी बेशुद्ध होण्यापासून वाचलो. कॉन्स्टेबल बेशुद्ध पडले होते. सील तोडून कुणी तरी घरात प्रवेश केला होता. आणि ज्या व्यक्तीचं हे काम होतं, ती व्यक्ती ग्रामोफोन घेवून बाहेर पडत होती. तोंड स्मोक मास्कनं झाकलेलं होतं. मी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला. आमच्यात हातापाई झाली. ग्रामोफोन तर माझ्या हाती लागला, पण ती व्यक्ती मात्र पळून गेली. पण ती व्यक्ती पळून जाताना माझ्याजवळ असलेलं माझं 'परमवीरचक्र' मी त्या व्यक्तीच्या खिशात टाकलं."

"मला माहितेय; ते 'परमवीरचक्र' तुम्हाला अतिप्रिय आहे. तुम्ही ते नेहमी स्वतः जवळच ठेवता. हं ना डॉक?" इन्स्पेक्टर म्हणाले.

"हो. पण त्यावेळी त्या मेडलपेक्षा एका गुन्हेगाराला पकडणं मला अधिक महत्त्वाचं होतं!"

डॉक बोलत असताना मला आठवलं, की मल्हार डॉकच्या घरी बसला होता, तेव्हा टी-पॉयवर 'परमवीरचक्र' ठेवलं गेलेलं होतं. याचा अर्थ काल रात्री मि. स्मिथ यांच्या घरी आलेली व्यक्ती

ही मल्हारच होती हे मला स्पष्ट झालं.

"म्हणजे त्या 'परमवीरचक्रा'वरून मल्हारने तुम्हाला ओळखलं आणि तो तुमच्या घरी पोहोचला. बरोबर न डॉक!?" मी विचारलं.

"होय! तो खरंच ब्रिलियन्ट आहे. हे आपल्याला मान्य करावंच लागेल. मी हे ओळखूनच ते मेडल त्याच्या खिशात टाकलं होतं.मला खात्री होती तो मला शोधून काढणार याची. कोल्हापूरात परमवीरचक्र किती जणांना मिळालं असेल? आणि त्यांनं ते अचूक शोधून काढलं."

"डॉक, मल्हारनं तुम्हाला काल पाहिलंच होतं. रात्री तुमची हातापाई होतानाही तुम्हीच आहात हे त्याच्या लक्षात आले असणारच ना? मग तुमचं परमवीरचक्र तुम्ही त्याच्या खिशात का टाकलं? तो तसाही तुम्हाला शोधत आलाच असता. आणि घरी बसलेला मल्हारच आहे हे तरी तुम्ही कसं ओळखलं?" मी शंका व्यक्त केली.

"बरोबराय. तसा तो हुशार आहे यात काही शंका नाही. तरी पण मला रिस्क घ्यायची नव्हती. म्हणून त्याला छोटीशी हिंट दिली.

त्यानं गुन्हा केला असेल, पण मला त्याची पितृभक्ती आवडली. म्हणून मला त्याच्याशी फेअर गेम खेळायचा होता. त्याची एक प्रिशियस वस्तू मी घेवून चाललो होतो. म्हणून माझी एक प्रिशियस वस्तू मी त्याच्याकडं दिली. त्याची वस्तू घेण्यासाठी तो येणारच होता. आणि येताना माझी घेवून येणार होता. भेले नंतर तो मला मारून टाकणार होता."

डॉक यांच्या न्यायबुद्धीवर मी खूपच प्रभावित झालो.

गुन्हेगाराशीही ते किती न्यायी वागतात... ते खरंच प्रेमळ आहेत, पण प्रसंगी ते कठोर होतानाही मी पाहिलंय. ते गुन्हेगाराच्या बाजूनेही जरी विचार करत असले, तरी त्या गुन्हेगाराला ते कधी माफ करत नाहीत.

डॉक माझ्या पुढच्या प्रश्नाचं उत्तर देवू लागले,

"आणि त्याच्याशिवाय दूसरं कोण असू शकणार होतं केवल? कारण भैरव तर आधीच मेला होता आणि तो जीवंत असता तरी त्यानं हे कृत्य केलं नसतं. भैरवला हे असं काही करायचं असतं तर, तो स्मिथ विरूद्ध कोर्टात गेलाच नसता. यावरूनच त्याच्यात असलेल्या संयमाचं दर्शन होतं! शिवाय तो जातिवंत गायक; कलाकार!

कला ही माणसाला संवेदनशील बनवते. संयमी बनवते. जो कलाकार संयमी नाही, संवेदनशील नाही; त्याला त्याची कला सोडून जाते. कारण कलेला हवं असतं ते निष्पाप प्रेमळ मन! कलाकाराचं मन कलूशीत झालं तर कला त्याच्याकडं टिकत नाही. एक लक्षात घे केवल, कलेमुळं सुबत्ता येते. प्रसिद्धीही मिळते; पण यामुळे कलाकारात उन्माद भरला, की त्याचा लोकसंग्रह कमी होतो. लोकसंपर्क कमी होतो. कलाकार आतून तुटतो. कलाकाराची कलेची उपासना कमी होते आणि हळू-हळू त्याची कला त्याला सोडून जाते. हा सगळा प्रवास!

जो जातिवंत कलाकार असतो, त्याला कधीही असं वाटणार नाही, की आपल्या कलेनं आपल्याला सोडून जावं. लोकांनी आपली प्रशंसा केली नाही तरी चालेल, पण कलेचं सानिध्य कायम रहावं ही हरएक कलाकाराची प्रखर इच्छा असते. त्यामुळं भैरव असं काही करणं शक्यच नाही हे स्पष्ट आहे! अरे त्याचं

मन तर इतकं संवेदनशील होतं की आपला गुरू गेला हे कळल्यावर त्यानंही प्राण सोडला."

"मग मि. स्मिथ यांचं काय? ते इतके अग्रेसिव्ह का होते मग?" मी नवीन प्रश्न केला.

"ॲल्फ्रेड स्मिथ हा कलाकार होता असं मी तरी म्हणणार नाही. तो खरंच कलाकार असता तर त्यांनं गायन कला ही महत्प्रयासानं शिकली असती. रियाज करून आत्मसात केली असती. अशी गुरूची कलाच चोरून पळून गेला नसता!"

डॉकनी दिलेलं उत्तर माझ्यासाठी समाधानकारक होतं. मी माझा पुढचा प्रश्न विचारला,

"आपण पकडले जावू अशी मल्हारला भीती नसेल वाटली?"

"तो त्यासंबंधी तयारी करूनच आला होता. त्याशिवाय का तो सोबत चाकू घेवून आला?! त्याला कोणत्याही परिस्थितीत ती कंपोजिशनस् मिळवायचीच होती. आणि कदाचित त्यानं मलाही ठार मारलं असतं. आणि तुलाही!" डॉकनी माझ्याकडं पाहिलं,

"कारण ज्यांचा-ज्यांचा त्या कंपोजिशनस्शी संबंध आला आहे, ते-ते मारले गेलेत! आणि आपलाही संबंध आला होताच ना! पण त्याला तशी संधीच मिळाली नाही!"

डॉक माझ्याकडं पाहत स्मित करत बोलले. तक्षणी मल्हारने जेव्हा माझ्या गळयावर चाकू धरला होता, तो क्षण माझ्या डोळयासमोर उभा राहिला. त्यावेळी मला भीती वाटली नव्हती, पण आता डॉकच्या अशा बोलण्यानं व अशा पद्धतीनं माझ्याकडं

बघण्यानं मात्र मला घामाच्या धारा लागल्या. त्यांच्या या तटस्थपणाची व निश्चलतेची आता तर मला भीतीच वाटायला लागली.

"एवढं सगळं करण्यापेक्षा तुम्ही त्याचवेळी मल्हारला का नाही पकडलं?" इन्स्पेक्टर यांचा प्रश्न.

"कारण प्रथम मला त्याचा ग्रामोफोन चोरण्यामागचा हेतू जाणून घ्यायचा होता. शिवाय त्या ग्रामोफोनमध्ये एक विषेशता आहे. ती म्हणजे तो ग्रामोफोन रेगुलर ग्रामोफोन पेक्षा थोडा उंचीचा आहे. म्हणून मला आधी त्या ग्रामोफोनचं परिक्षण करणं अधिक महत्त्वाचं वाटलं. कारण हेच खूनामागचं कारण असणार हे मला पक्कं झालं होतं. शिवाय तोच मला शोधत येईल अशी तरतूद तर मी करूनच ठेवली होती! घरी येवून मी ग्रामोफोन पाहिला, तर त्याच्या खाली एक ड्रॉव्हर मला आढळला आणि त्या ड्रॉव्हरमध्ये मला कंपोजिशन नोटस् सापडल्या."

"ग्रामोफोनचं रहस्य कळल्यावरच मल्हारनं तो का नाही चोरला?" इन्स्पेक्टर यांचा आणखी एक प्रश्न.

"त्याला फक्त कंपोजिशन्सच नको होत्या, तर त्याला स्मिथनाही मारायचं होतं. स्मिथना मारण्याआधीच त्यानं ग्रामोफोन चोरला असता, तर स्मिथनी पोलिस कंप्लेंट केली असती आणि इन्क्वायरी चालू असल्यानं त्याला स्मिथना ठार मारता आलं नसतं. म्हणून आधी मल्हारनं स्मिथना मारलं. त्यानंतर एक-दोन दिवसांत ग्रामोफोन उडवण्याचा त्याचा विचार असणार. ज्यामळे कोणाच्या हे लक्षात येणार नाही. कारण घरचा मालक मेला असताना घरातील एक जूनी वस्तू कुठं गेली याची चौकशी कदाचित कुणी केली नसती. पण त्याचं दूर्दैव; की इन्स्पेक्टर जगताप इथं आले व

खून झाल्याचं उघड झालं!

नपेक्षा खून करण्याची पद्धतच इतकी विलक्षण होती, की तो कधी पकडलाच गेला नसता. सर्वांना हेच वाटलं असतं, की स्मिथ हे अस्थमा अटॅकनं मेलेत! आणि जर कोणी पकडलं गेलं असतंच, तर त्या स्टेला स्मिथ. कारण त्याच 'अर्जेंटिना अल्टिसीमा'वर रिसर्च करत होत्या. मि. स्मिथ व त्यांच्यात सतत भांडणंही होत. ही गोष्ट या दोघांशी संबंध असणाऱ्या प्रत्येकाला माहित होतीच. त्यामुळं थेट सर्वांच्या संशय स्टेला यांच्यावर गेला असता. गंमत बघा; अनायासे हीच आयडिया स्टेला यांनीही वापरली होती. पण स्मिथ यांच्या स्वाभावामुळं त्या प्रयत्नात ते बचावले. पण मल्हारचा प्लॅन इतका फुलप्रूफ होता, की त्याचा सुगवाही स्मिथना लागणं कठीण होतं. म्हणून तर ते स्वस्थ झोपले होते."

"मल्हारनं फक्त ती कंपोजिशनस् न नेता ग्रामोफोन नेण्याचा अट्टहास का केला? कारण ते त्याला सोपं पडलं असतं आणि त्यानं तसं केलं असतं तर तो तुमच्या हातीही लागला नसता?" इन्स्पेक्टर यांचा डॉकना आणखी एक प्रश्न.

"स्मिथ तो ग्रामोफोन सतत जवळ बाळगायचे म्हणून मल्हारला ग्रामोफोन मध्ये काही महत्त्वाचं असल्याचा सुगावा लागला असणार. त्यानं पूर्ण घर धुडाळून काढलं. तरी त्याच्या हाती काही लागलं नाही. स्मिथ यांची खोली मात्र त्याला कधी पाहता आली नाही कारण, ते नेहमी त्यांच्या खोलीतच असायचे. ग्रामोफोन सतत स्मिथ सोबत असल्यानं त्याला खोलीत इतर पाहण्याची गरज नाही हे मल्हारच्या लक्षात आलं. पण ग्रामोफोनची पाहणी करण्यासाठी त्याला तशी संधीच मिळालेली नसणार.

स्मिथ गेल्याच्या रात्री म्हणजे काल त्याच्याकडं तसा वेळ

होता, पण त्याला आपल्याला मिसगाईड करण्यासाठी या खोलीत खोटे पुरावे निर्माण करायचे होते. शिवाय ग्रामोफोन तर त्याच्या हाती लागलाच होता. त्यामुळं त्यानं त्याचं परिक्षण करण्याची तसदी घेतली नाही. हुशारातला हुशार गुन्हेगार एखादी तरी चूक करतोच. तशी मल्हारनंही केली. ती अशी, की ग्रामोफोन चारण्याची त्यानं घाई केली. त्याला वाटलं असेल स्टेला स्मिथ तर पकडल्या गेल्याच आहेत. आता त्याला काही धोका नाही. आणि त्याची हीच चूक त्याला भोगावी लागली.

"सगळं समजलं डॉक, पण खून कसा झाला हे तर तुम्ही सांगितलंच नाही..." इन्स्पेक्टर जगताप यांची उत्सुकता आता शिगेला गेली होती. डॉक हसले.

"ते डिपार्टमेंट केवलकडं आहे!" ते म्हणाले.

इन्स्पेक्टरनी प्रश्नार्थक भावमुद्रेनं माझ्याकडं पाहिलं.

"ब्लो पाईप!" मी उत्तरलो.

"ब्लो पाईप? ते कसं?" इन्स्पेक्टर गोंधळले.

"मल्हारनी एक लांब पण नाजूक सूई घेतली. त्याला अर्जेंटिना अल्टिसीमाचा रस लावला. सूईला एक धाग बांधून तीचा ब्लो पाईपनं झोपलेल्या मि. स्मिथ यांच्या श्वसन नलिकेवर वार केला. ही कला नक्कीच ते साऊथ आफ्रिकेतील आदिवाशांकडून शिकले असणार. नंतर त्यांनी बांधलेल्या धाग्याच्या सहाय्यानं सूई मागं खेचून घेतली. त्यामुळं मि. स्मिथ हे 'ट्रेमेडॉल' या विषानं श्वसनाचा त्रास होवून मृत्यूमुखी पडले. ही इज् ट्रूली ए जिनिअस्!"

“पण एक पातळ सूई ब्लो पाईपने फुंकूनही इतक्या लांब कशी जाईल?” इन्स्पेक्टरनी मला विचारलं. मी सांगू लागलो.

“जावू शकते. त्यानी एरोडायनॅमिक्स्चा वापर केला. एक लांब ब्लो पाईप वापरली. शिवाय सूईही बऱ्यापैकी लांबच वापरली. सूईला मागे गरूडपंख लावून त्यानं तिचं वजन व दूरी वाढवली असणार! सूई टोचल्यावर मि. स्मिथ यांनी ते काय आहे पाहण्याचा प्रयत्न केला असणार. म्हणून कदाचित त्या सूईचे पिस खाली पडले असणार. जे काल तुम्हाला सापडले.”

“गूड! वेरी गूड!” डॉक अधीरपणे ओरडले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व माझ्याबद्दलचा अभिमान एकत्र जाणवत होता मला.

स्टेला मॅम आमच्यासाठी चहा घेवून आल्या. त्या फ्रेश होवून आल्याने त्यांना यायला उशीर झाला होता. आणि कदाचित जे काही झालं त्याच्यावर चर्चा करणं त्यांना टाळायचं असावं. पण इन्स्पेक्टरनी विषय काढलाच.

“मरणापूर्वी मि. स्मिथना माझ्याशी कोणत्या विषयावर बोलायचं होतं याची तुम्हाला काही कल्पना आहे?” चहाचा घोट घेत इन्स्पेक्टरनी मॅमना विचारलं.

“ॲल्फ्रेड वॉज् कंपोजिंग ए न्यू म्युजिक पिस, बट इट वॉजन्ट् कंप्लीट. ॲट दॅट टाईम, वन ऑफ हिज् स्टूडन्टस् नीतिन स्टोल इट ॲन्ड सोल्ड इट टू ए फिल्म प्रोडक्शन कंपनी. सो ही वॉन्टेड टू टेक ॲन ॲक्शन ऑन हीम.” मॅमनी खुलासा केला.

“हं! जैसा गुरू वैसा चेला!” डॉक उद्गारले. आणि गंभीर होवून पुढं म्हणाले,

“मॅम; मी पुन्हा एकदा मनापासून तुमची माफी मागतो. आय ॲम रिअली वेरी सॉरी!”

“डॉक; मर्डर तेव्हा होत नाही जेव्हा प्रत्यक्ष वार होतो. तर मर्डर तेव्हाच झालेला असतो, जेव्हा मर्डर करण्याचा विचार मनात येतो. मर्डर इज दी ओन्ली रिॲक्शन ऑफ दॅट थॉट! ॲन्ड आय गॉट दी पनिश्मेंट फॉर वॉट आय डीड. सो डॉन्ट बी सॉरी! आय ॲम नॉट ब्लेमिंग यू!” त्या शांतपणे म्हणाल्या.

सगळं वातावरण शांत झालं. सर्वजण आपापल्या विचारात मग्न झाले.

रात्र झाल्यानं डॉक मला घरी सोडायला आले. इन्स्पेक्टरनी जीप मागवून घेतली होती व ते आमचा निरोप घेवून परतलेही होते.

गाडीत -

“डॉक, तुम्हाला सर्व आधीपासूनच माहित होतं; तर तुम्ही मला का नाही सांगितलंत?” माझ्यावर विश्वास नाही का तुमचा?” मी नाराजीनं डॉकना विचारलं.

डॉकनी माझ्याकडं पाहून स्मित केलं. त्यांच्या अशा स्मित करण्याला मी आता सरावलो होतो. त्यांच्या हसण्यात एक

विलक्षण चैतन्य आहे. ते म्हणाले,

"तसं नाही. मला हे पहायचं होतं, की तुझा माझ्यावर किती विश्वास आहे. आपण जेव्हा एखादी गोष्ट गुरूकडून शिकत असतो, तेव्हा आपली आपल्या गुरूवर निष्ठा असणं, श्रद्धा असणं खूप महत्त्वाचं असतं. अपला गुरू आपल्याला ज्या मार्गानं नेत आहे तो मार्ग योग्य आहे, असा आपला दृढ विश्वास असला पाहिजे. तरच आपण ती गोष्ट शिकू शकतो. कारण गुरूवर विश्वास असल्यावरच शिष्य प्रयत्नात कुठं कमी पडत नाही. तू माझ्या परिक्षेत यशस्वी झाला आहेस केवल!"

शेवटचं वाक्य डॉकनी माझ्याकडं पाहून स्मित करत म्हंटलं. हे ऐकून मला खूप बरं वाटलं. माझ्या चेहऱ्यावर स्मित उमटलं.

गाडी रस्त्यावरून माझ्या घराच्या दिशेनं धावत होती. मी मात्र आनंदाच्या सप्तस्वर्गात विहार करत होतो...

**समाप्त!**

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

“Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow.”

– Oliver Wendell Holmes

